सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १७३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ४ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाची मंजुरी

### नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह होणार निवडणुका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नवी दिल्ली/मुंबई**

राज्यातील महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या नवीन वॉर्ड/प्रभाग रचनेला हिरवा कंदिल दाखवत त्या विरोधातील सर्व याचिका फेटाळून लावल्या आहेत. तसेच, प्रभाग रचना करण्याचा अधिकार हा पूर्णतः राज्य सरकारचाच असल्याचा निर्वाळाही न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे आता ओबीसी आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यातील औसा नगरपालिकेसंदर्भातील एक महत्त्वाची याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेद्वारे मागणी करण्यात आली होती की औसा नगरपालिकेची निवडणूक ही ११ मार्च २०२२ पूर्वी अस्तित्वात असलेल्या वॉर्ड रचनेनुसार घ्यावी. मात्र, या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने ती फेटाळून लावली.निवडणूक आयोगाने याआधीच औसा नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी नवीन वॉर्ड रचनेची अधिसूचना जारी केली होती. न्यायालयाच्या निर्णयामुळे आता ही निवडणूकही नव्या वॉर्ड रचनेनुसारच पार पडणार आहे, हे स्पष्ट झाले आहे.

या निर्णयामुळे राज्यातील अनेक थांबलेल्या किंवा रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना गती मिळणार असून, पुढील काळात निवडणूक आयोगाकडून निवडणुकांच्या तारखा जाहीर होण्याची शक्यता आहे. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सुद्धा या निवडणुकांमध्ये निश्चित झाल्याने राज्यातील ओबीसी समाजालाही राजकीय प्रतिनिधित्वाची संधी मिळणार आहे.

**राजकीय घडामोडींना गती मिळण्याची शक्यता**

राज्यातील अनेक प्रमुख महानगरपालिका आणि नगरपालिका निवडणुका विविध कारणांमुळे रखडल्या होत्या. या निर्णयानंतर मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, तसेच अमरावती, सोलापूर आदी ठिकाणच्या निवडणुकांना चालना मिळणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तासंघर्षांना नवसंजीवनी मिळण्याची शक्यता असल्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**निवडणूक लांबणीवर, कोर्टाने फटकारले**

दरम्यान, याआधीच्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने तुम्हाला निवडणूक करायची आहे की नाही असा प्रश्न राज्य निवडणूक आयोगाला केला होता. निवडणुका रोखण्याचे काही कारण दिसत नाही. याआधी ओबीसी आरक्षणामुळे निवडणूक थांबली होती. परंतु आता निवडणूक घेण्याचे आदेश दिले आहेत. नवीन की जुनी प्रभाग रचना यावर सुनावणी होत राहील. कोर्टाने निवडणूक आयोगाला अधिसूचना जारी करण्यासाठी ४ आठवड्यांची वेळ दिली होती. त्यानंतर ठराविक कालावधी ठरवून निवडणूक ४ महिन्यात पूर्ण होतील असा आदेश सुप्रीम कोर्टाने मे महिन्याच्या सुनावणीत दिला होता. आता आजच्या सुनावणीत नवीन प्रभाग रचनेसह निवडणूक घेण्यास परवानगी दिल्यानं निवडणुका होण्याचा अडथळा दूर झाला आहे.

## राहुल गांधींना ‘त्या’ विधानावरून सुप्रीम कोर्टानं सुनावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नवी दिल्ली**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते व काँग्रेस खासदार राहुल गांधींनी केलेल्या एका विधानावरून सर्वोच्च न्यायालयाने त्यांना सुनावलं आहे. २०२२ च्या डिसेंबर महिन्यात राहुल गांधींनी भारतीय लष्कराबाबत अवमानकारक विधान केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. यासंदर्भात राहुल गांधींविरोधात न्यायालयात याचिकादेखील दाखल करण्यात आली होती. ही याचिका वाईट हेतूने करण्यात आल्याचा दावा राहुल गांधींनी केला होता. त्यावरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने त्यांना कठोर शब्दांत सुनावलं. इंडियन एक्स्प्रेसनं यासंदर्भातलं सविस्तर वृत्त दिलं आहे.

तुम्ही लोकसभा विरोधी पक्षनेते आहात. तुम्ही तुमची मतं संसदेत मांडायला हवीत, सोशल मीडियावर नाही, असं राहुल गांधींना बजावतानाच न्यायालयाने त्यांच्या विधानावरही टिप्पणी केली.



चीननं भारताचा २ हजार चौरस किलोमीटरचा भूभाग गिळंकृत केला आहे, हे तुम्हाला कसं कळलं? तुम्ही तिकडे होतात का? तुमच्याकडे याची काही विश्वासार्ह माहिती आहे का? जर नसेल तर मग तुम्ही अशी विधानं का करता? असा सवाल न्यायालयाने राहुल गांधींना केला. तसेच, जर तुम्ही खरे भारतीय असाल, तर तुम्ही असं विधान केलं नसतं, असंही न्यायमूर्ती यावेळी म्हणाले.

## येमेनच्या समुद्रात बोट उलटली
## ६८ जणांना जलसमाधी, ७४ जण अद्याप बेपत्ता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४साना**

येमेनच्या किनाऱ्याजवळ रविवारी एक मोठी आणि हृदयद्रावक दुर्घटना घडली. १५४ स्थलांतरितांना घेऊन जाणारी एक बोट समुद्रात उलटल्याने किमान ६८ आफ्रिकन स्थलांतरितांचा मृत्यू झाला असून, ७४ जण अद्याप बेपत्ता असल्याची धक्कादायक माहिती संयुक्त राष्ट्रांच्या स्थलांतरण संस्थेने (खजच्) दिली आहे. या घटनेमुळे बेकायदेशीर स्थलांतरणाच्या धोकादायक वाटांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

या प्रांतातील एका वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्याने, अब्दुल कादिर बजमील यांनी सांगितले की, आतापर्यंत केवळ १० जणांना वाचवण्यात यश आले आहे. यामध्ये ९ इथिओपियन आणि एका येमेनी नागरिकाचा समावेश आहे. अजूनही अनेक जण बेपत्ता असून, रात्री उशिरापर्यंत बचावकार्य सुरू होते, असेही त्यांनी सांगितले. स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, बचाव पथके समुद्रात मृतदेह आणि वाचलेल्यांचा शोध घेत आहेत. येमेनमधील आंतरराष्ट्रीय स्थलांतरण संस्थेचे (खजच्) प्रमुख अब्दुसत्तोर एसोएव यांनी असोसिएटेड प्रेसला सांगितले की, १५४ इथिओपियन स्थलांतरितांना घेऊन जाणारे हे जहाज रविवारी सकाळी दक्षिण येमेनच्या अब्यान प्रांताजवळ अदनच्या आखातात बुडाले. हॉर्न ऑफ आफ्रिका (आफ्रिकेचे शिंग) आणि येमेन दरम्यानचा सागरी मार्ग अत्यंत धोकादायक असल्याचा इशारा खजच् ने वारंवार दिला आहे. इथिओपिया आणि सोमालियासारख्या देशांतील स्थलांतरित चांगल्या नोकरीच्या आशेने सौदी अरेबिया किंवा इतर आखाती देशांमध्ये पोहोचण्यासाठी आपला जीव धोक्यात घालून हा प्रवास करतात. हा जगातील सर्वात व्यस्त आणि धोकादायक स्थलांतरण मार्गांपैकी एक आहे, असे खजच् ने एका निवेदनात म्हटले आहे. २०२४ मध्ये आतापर्यंत ६०,००० हून अधिक स्थलांतरितांनी येमेनमध्ये प्रवेश करण्याचा धोका पत्करला आहे. २०२३ मध्ये हा आकडा ९७,२०० होता. सागरी मार्गांवरील गस्त वाढल्यामुळे स्थलांतरितांच्या संख्येत काही प्रमाणात घट झाल्याचे खजच् चे म्हणणे आहे. गेल्या वर्षी या मार्गावर ५५८ जणांचा मृत्यू झाला होता, तर गेल्या दशकात किमान २,०८२ स्थलांतरित बेपत्ता झाले आहेत, त्यापैकी ६९३ जण बुडाल्याची पुष्टी झाली आहे.

येमेनमध्ये २०१४ पासून गृहयुद्ध सुरू असून तेथे आधीच मोठे मानवतावादी संकट आहे. तरीही, आफ्रिकन स्थलांतरितांसाठी येमेन हे एक प्रमुख संक्रमण केंद्र बनले आहे. अनेक जण येथून आखाती देशांमध्ये जाण्याचा प्रयत्न करतात, तर काही जण येथेच अडकून पडतात.

## समृद्धीने सुसाट निघाल तर पकडले जाल
## तुमच्यावर लक्ष ठेवणार एक हजार ‘डोळे’

### प्रत्येक किलोमीटरवर लागणार सीसीटीव्ही कॅमेरे, ऑनलाइन दंडाची पावती लगेच मोबाइलवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

नागपूर ते मुंबई या समृद्धी महामार्गावर सुसाट वेगाने धावणाऱ्या वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी आता ७०१ किमी अंतरापर्यंत सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जात आहेत. वेगमर्यादेचे उल्लंघन झाल्यास ऑनलाईन दंड आकारला जाणार आहे.



अपघात रोखण्यासाठी महामार्गावर विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. विदर्भ-मराठवाड्यासह अहिल्यानगर, ठाणे, पालघर या जिल्ह्यांमध्ये महामार्गामुळे कनेक्टिव्हिटी वाढलेली आहे. या महामार्गावर कारसाठी ताशी किमान १२० कि.मी. तर ट्रकसाठी ८० अशी वेगमर्यादा दिली आहे. मात्र त्याचे उल्लंघन होताना दिसते.

**तिसरा डोळा ठेवणार नजर**

समृद्धी महामार्गावर लहान-मोठ्या वाहनांची वेगमर्यादा किती? यावर आता सीसीटीव्हीची नजर असणार आहे. प्रत्येक १ किमी अंतरावर एक कॅमेरा बसवला जाणार आहे. किमान एक हजार कॅमेरे या महामार्गावर लागणार असून, त्याकरिता एमएसआरडीसीने दोन नामांकित कंपनीसोबत करार केला आहे.

महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर मुंबई येथून नागपूरच्या दिशेने मोठ्या प्रमाणात वाहने धावत आहेत. अल्पकाळात वाहनांची वर्दळ वाढली असून, लहान-मोठी अशी दरमहा ११ लाख वाहने धावत असल्याचा अंदाज आहे.इतर महामार्गांच्या तुलनेत अवजड वाहनांसाठी जादा टोल असतानासुद्धा कमी वेळेत गंतव्य ठिकाणी पोहोचता येत असल्यामुळे समृद्धी महामार्गावर वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढतच असल्याची माहिती नागपूर येथील एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंता गजानन पळसकर यांनी दिली.

**...तर होणार ऑनलाइन दंड**

या महामार्गावर लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे हे बारीकसारीक बाबींवर लक्ष ठेवणार आहेत. एक कॅमेरा ५०० मीटर परिघातील चित्रण करणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरे तपासणीची व्यवस्था प्रत्येक जिल्ह्यात कंट्रोल रूम तयार करून बघितली जाणार आहे. महामार्गाने प्रवास करताना नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित चालकांना ऑनलाईन दंड निश्चित केला जाणार आहे.

## डॉ. विजय इंगोले यांच्या सावलीवर मात करणारे सौर ऊर्जा मॉड्यूलचे नवे संशोधन पेटंट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

सौर ऊर्जा आज जगाच्या ऊर्जा क्रांतीचे केंद्रबिंदू मानल्या जाते. पण त्यावर पडणारी सावली हा त्यातील सर्वांत मोठा शत्रू आहे. झाडाची फांदी, इमारतीची सावली किंवा तारेची रेषा सावली जरी सोलर पॅनलवर पडली तरी वीज निर्मिती जवळपास थांबते आणि सौर यंत्रणेला आगीची संभावना असते. मात्र अमरावतीचे डॉ. विजय इंगोले यांच्या ‘सौर मॉड्यूल कार्यक्षमतेचे ऑप्टिमायझिंग करण्यासाठी अँटी-शेडिंग डिव्हाइस’ यांच्या नव्या संशोधनामुळे या समस्या कायमच्या मिटल्या असून त्याची अंतर्गत रचना बदलणारी सावली



प्रतिबंधक सौर पद्धत आता या नवीन पेटंटद्वारे अधिकृत झाली आहे.

सौर पॅनलवर पडणाऱ्या सावलीमुळे होणारी वीज निर्मितीतील घट रोखण्यासाठी विकसित केलेल्या या अभिनव तंत्रज्ञानाचे पेटंट राष्ट्रीय पातळीवर चर्चेचा विषय ठरत आहे. डॉ. इंगोले यांनी आतापर्यंत ३९ पेटंट दाखल केली आहेत. सौर तंत्रज्ञान, विद्युत उपकरणे, यांत्रिक इंजिन डिझाइन या क्षेत्रात त्यांनी अनेक मौलिक संकल्पना विकसित केल्या आहेत. ग्रीन सर्कल या त्यांच्या अनुसंधान केंद्रात त्यांचे संशोधनाचे कार्य अविरतपणे सुरू आहे. जगभरात कार्बन फुटप्रिंट कभी करण्यासाठी नवीकरणीय ऊर्जेकडे जलद गतीने वळण सुरू आहे. भारताने २०३० पर्यंत १०० जीडब्ल्यू नवीकरणीय ऊर्जा क्षमतेचे लक्ष्य ठरवले असून डॉ. इंगोले यांचे हे पेटंट त्या मिशनशी सुसंगत असून, हरित ऊर्जेचा प्रसार वेगाने करण्यात मदत ठरेल. विशेष म्हणजे भारताकडे थार वाळवंटासारखी प्रचंड सौर क्षमता आहे. याशिवाय आपने पंतप्रधान यांनी मांडलेली ''''वन सन, वन वर्ल्ड, वन ग्रीड' (सूर्य कधी न मावळणारे जाळे) ही संकल्पना प्रत्यक्षात येईल. ज्यात जगभरातील सौर ऊर्जेचे जाळे परस्पर ओढले जाईल. आणि उर्जा साठवण बॅटऱ्यांची गरजही कमी होईल.

**भारत जागतिक पातळीवर ऊर्जेचा पुरवठादारही बनू शकेल**

सौर ऊर्जा सेवेसाठी अधिक विश्वासार्ह, सुरक्षित आणि परवडणारी करणे हा आहे. देशात नवीकरणीय ऊर्जेचा खरा क्रांतिकारी वापर होईल हा नवीन संशोधनाचा उद्देश असल्याचे डॉ. इंगोले यांनी सांगितले. भविष्यात अशा तंत्रज्ञानाच्या आधारे भारत फक्त ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबी होणार नाही तर जागतिक पातळीवर ऊर्जेचा पुरवठादारही बनू शकेल, असेही संशोधक डॉ. विजय इंगोले यांनी सांगितले.

## ६ ऑगस्टला बच्चू कडू राज ठाकरेंची भेट घेण्याची शक्यता शेतकरी आंदोलनाला मनसेचं पाठबळ मिळणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

मराठीच्या मुद्द्यावरून मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर त्यांनी दिलेल्या आवाहनाला अनेक नेत्यांनी प्रतिसाद दिला. ना झेंडा फक्त मराठीच अजेंडा असा नारा राज ठाकरे यांनी दिला होता. त्यानंतर राज ठाकरे यांनी सातत्याने महायुती सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यात आता प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू येत्या ६ ऑगस्टला मनसे प्रमुख राज ठाकरे यांची भेट घेणार आहेत.

मागील काही दिवसांपासून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर बच्चू कडू यांनी ग्रामीण भागात आंदोलन उभे केले आहे. त्यात शेतकरी कर्जमाफीचा कळीचा मुद्दा आहे. निवडणुकीपूर्वी महायुतीने शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करू असं आश्वासन दिले होते परंतु सत्तेत येऊन १० महिने उलटले तरीही सरकारने अद्याप शेतकरी कर्जमाफी केली नाही. त्यामुळे शेतकरी कर्जमाफी आणि इतर मुद्द्यांवर बच्चू कडू आणि राज ठाकरे यांची भेट होणार आहे. बच्चू कडू यांच्या शेतकरी आंदोलनाला




मनसेने पाठिंबा दिला होता. मनसे नेते बाळा नांदगावकर हे कडूंनी पुकारलेल्या आंदोलनात सहभागी झाले होते.

तर बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांसाठी दिंडी काढलेली आहे. सातबारा कोरा होण्यासह आणखीही काही त्यांच्या मागण्या आहेत. त्यासाठी आपल्या पक्षातर्फे त्यांना पाठिंबा देण्याची गरज आहे. राज ठाकरे यांनी तात्काळ होणार दिला. राज ठाकरे मला म्हणाले की, केवळ पाठिंबा देऊ नको, तर तू स्वतः त्या ठिकाणी जा. बच्चू कडू यांच्या दिंडीत सहभागी होऊन शेतकऱ्यांना निरोप दे की, त्यांच्या प्रत्येक लढ्यात आम्ही सोबत आहोत. कुठूनही पैसे आणा पण शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा असं मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी म्हटलं होते.

दरम्यान, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या मेळाव्याला हजेरी लावली. या मेळाव्यात त्यांनी शेतजमिनी विकू नका, उद्योगात मराठी माणसांना भागीदारी द्या असे मुद्दे मांडले होते. शेकाप पक्षाच्या दुसऱ्या कार्यक्रमाला राज ठाकरे यांनी हजेरी लावली होती. यावेळी लाल झेंड्याच्या व्यासपीठावर २ भगवे झेंडे आले आहेत असं विधान राज यांनी केले होते.

## राज ठाकरेंचे जुन्या सहकाऱ्यांना सोबत घेण्याचे आदेश ; बाळा नांदगावकरांचं वक्तव्य

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.४मुंबई**

आपसात कोणत्याही प्रकारचा वाद न ठेवता निवडणुकीच्या तयारीला लागा अशी सूचना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज (४ ऑगस्ट) पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यातून केली. राज ठाकरे यांचे निकटवर्तीय व मनसेचे नेत बाळा नांदगावकर यांनी मेळाव्यानंतर प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. नांदगावकर म्हणाले, लवकरच महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. संघटनात्मक दृष्टीकोनातून काय काय करायला हवं याबाबत त्यांनी आम्हाला मार्गदर्शन केलं.

यावेळी नांदगावकर यांना वार्ताहरांनी विचारलं की मनसे व शिवसेना (उबाठा) युतीविषयी काही चर्चा झाली का? किंवा पदाधिकाऱ्यांना मनसे अध्यक्षांना त्याबाबत विचारणा केली का? यावर नांदगावकर म्हणाले, यावर कुठल्याही प्रकारची चर्चा झाली नाही. युतीचा निर्णय राज ठाकरे स्वतः घेतील. पदाधिकारी मेळाव्यात युतीचा विषय काढला नव्हता. मात्र, राज ठाकरे यांनी आम्हाला सांगितलं आहे की तुम्ही एकमेकांना मानसन्मान दिला पाहिजे. आपण कसं वागतो त्यावर अनेक गोष्टी अवलंबून असतात.

## संपादकीय ......

# अत्याचारी प्रज्वलला शिक्षा

जनता दल (धर्मनिरपेक्ष) पक्षाचा माजी खासदार प्रज्वल रेवण्णा याला बंगळूरमधील विशेष न्यायालयाने बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. यामुळे अतिमहत्त्वाच्या व्यक्तीही कायद्याच्या चौकटीबाहेर नाहीत, हेच पुन्हा अधोरेखित झाले आहे. प्रज्वल हा माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचा नातू आणि माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय अवजड उद्योगमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांचा पुतण्या असून, त्याला पक्षातून निलंबित केले आहे. बंगळूरमधील विशेष न्यायालयाचे न्यायाधीश संतोष भट यांनी ३४ वर्षीय प्रज्वलला जन्मठेप सुनावतानाच १० लाख रुपयांचा दंडही ठोठावला. त्याच्या विरोधात लैंगिक छळ आणि बलात्काराचे चार खटले दाखल केले असून, त्यापैकी एका खटल्यात विशेष न्यायालयाने त्याला दोषी ठरवले होते. कर्नाटकमधील हासन जिल्ह्यातील होलेनारसीपुरा येथे देवेगौडा यांच्या कुटुंबीयांचे फार्म हाऊस आहे. तिथे काम करणार्या एका ४८ वर्षीय महिलेने २०२१ मध्ये प्रज्वलने आपल्यावर दोनवेळा बलात्कार केल्याची, तसेच ते कृत्य मोबाईल फोनवर चित्रित केल्याची तक्रार दाखल केली होती.

सरकारी पक्षाने त्याला जन्मठेपेचीच शिक्षा द्यावी, अशी मागणी केली होती, तर आपण कोणताही गुन्हा केलेला नाही, असा युक्तिवाद प्रज्वलच्या वतीने करण्यात आला. राजकारणात वेगाने भरभराट झाली, हीच केवळ चूक आहे, असे प्रज्वलच्या वतीने न्यायालयात सांगण्यात आले; मात्र त्याच्या राजकीय विकासाशी सामान्यांना काहीही देणेघेणे नाही. त्याने नीच कृत्य केले आहे. म्हणूनच त्याला जन्मठेप ठोठावली असून, हे योग्यच झाले. प्रज्वलने सातत्याने त्याच्याकडे काम करणार्या स्त्रीच्या परिस्थितीचा व असाह्यतेचा लाभ उठवून तिच्यावर वारंवार अत्याचार केले. शिवाय या घटनेबद्दल कोणालाही सांगितल्यास व्हिडीओ लीक करण्याची धमकी दिली होती. मुळात त्याने पन्नासहून अधिक स्त्रियांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच त्याने शूट केलेल्या असंख्य आक्षेपार्ह व्हिडीओ क्लिप्स समाजमाध्यमांवर आलेल्या आहेत. एखाद्या स्त्रीवर वर्चस्व गाजवण्याच्या स्थितीत असता, तेव्हा त्याचा फायदा उठवून तिच्यावर अत्याचार केल्यास कायद्यातील ३७६-२ के हे कलम लागू होते. प्रज्वलवर ते लावले आहे. त्याची ही प्रकरणे बाहेर आल्यानंतर तो जर्मनीला पळाला होता. तेथून तो परतल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. निवडणुकांच्या अगोदरच त्याचे व्हिडीओ व्हायरल झाल्यामुळे अर्थातच लोकसभा निवडणुकीत त्याचा पराभव झाला. जनतेनेही त्याच्या पापाची त्याला सजा दिली. दि. २ मे २०२४ला प्रज्वल विरुद्धच्या खटल्याची सुनावणी सुरू झाली. डिसेंबर २०२४ मध्ये आरोपपत्र सादर करण्यात आले. ११३ साक्षीदारांनी साक्ष दिली. दि. ३० एप्रिल २०२५ रोजी आरोप निश्चित करण्यात आले. साधारण सव्वा वर्षात सुनावणी पूर्ण होऊन प्रज्वलला शिक्षा दिली आहे. इतर अनेक प्रकरणांच्या मानाने या खटल्याचा वेगाने निपटारा केला आहे, हे अभिनंदनीय आहे. प्रज्वलच्या माजी वाहनचालकाने त्याच्या विरुद्ध साक्ष दिली. त्याच्या फोनमध्ये २८ फोटो आणि ४० ते ५० अश्लील व्हिडीओज पाहिले, अशी साक्ष त्याने दिली होती. त्याने घरी काम करणार्या स्वयंपाकिणीवर आणि तिच्या मुलीवरही अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच जेडीएसच्या माजी जिल्हा पंचायत कार्यकर्त्याला मारहाण करणे, धमक्या देणे असेही गुन्हे त्याच्यावर दाखल आहेत. या खटल्यांची सुनावणी अद्याप व्हायची आहे.लोकशाही, धर्मनिरपेक्षता, उदारमतवाद, महिला विकास अशा विषयांवर लांबलचक भाषणे ठोकणार्या देवेगौडा यांच्या घराण्यात प्रज्वलसारखा कुलदीपक वेगळेच प्रताप करत होता. देवेगौडा व कुमारस्वामी यांना याची कल्पनाच नसेल, तर ते आश्चर्यकारक आहे. त्याचे वडील एच. डी. रेवण्णा हेही जेडीएसचे नेते असून, त्यांनी मंत्रिपद भूषवले आहे; मात्र गेल्या वर्षी एका तरुणीचे अपहरण केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. रेवण्णा यांचा दुसरा मुलगा म्हणजेच प्रज्वलचा भाऊ सूरज यालाही लैंगिक सतावणुकीच्या आरोपावरून गेल्या वर्षी पोलिसांनी अटक केली होती. आपल्याकडे सत्ता आहे म्हणून आपण काहीही केले, तरी ते खपून जाईल, असे नेत्यांना वाटत असते. महिलेचे शोषण केले, तरी ती 'ब्र'देखील काढू शकणार नाही, ही खात्री त्यामागे असते.

'असोसिएशन ऑफ डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्स' आणि 'नॅशनल इलेक्शन वॉच' या संस्थांनी मिळून केलेल्या अभ्यासातून भयंकर वस्तुस्थिती पुढे आलेली आहे. देशातील १६ खासदार आणि १३५ आमदारांवर बलात्कार, विनयभंग, कौटुंबिक हिसाचार, वेश्या व्यवसायासाठी अल्पवयीन मुलींची खरेदी-विक्री असे गंभीर आरोप आहेत. भाजपच्या सर्वाधिक लोकप्रतिनिधींवर महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल असल्याचे या अहवालात म्हटले आहे. स्त्रियांवर अत्याचार करण्यात पश्चिम बंगालमधील सर्वाधिक लोकप्रतिनिधींचा समावेश आहे. महाराष्ट्रात १३ लोकप्रतिनिधींवर महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल आहेत. कायदे बनवणारेच गुन्हेगार असतील, तर न्यायाची अपेक्षा कोणाकडून करायची, असा प्रश्न पडतो. मुळात महिला अत्याचाराचा गुन्हा दाखल असताना प्रज्वलसारख्या नेत्यांना विविध राजकीय पक्ष तिकीट देतातच कसे? डेरा सच्चा सौदाचा प्रमुख आणि बलात्काराचा दोषी गुरमित रामरहीम सिंग याला सतत निवडणुकींच्या वेळी पॅरोल मिळतो. दोन शिष्यांवर अत्याचार केल्याबद्दल तो २० वर्षांची शिक्षा भोगत आहे. अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी स्वयंघोषित संत आसारामबापूलाही जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. गेल्यावर्षी त्यालाही पॅरोल मिळाला होता.

खरे तर, 'बेटी बटाओ, बेटी पढाओ' या घोषणेमुळे स्त्री-पुरुष विषमता कमी होऊ लागली. स्त्रियांना २६ आठवड्यांची मातृत्वाची रजा देण्याचा निर्णय झाला. लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवणारे 'नारीशक्ती वंदन विधेयक' दोन वर्षांपूर्वी संसदेत मंजूर झाले. महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी, असे सरकारचे धोरण आहे; पण प्रत्यक्षात अनेक राजकीय नेतेच महिलांशी दुर्वर्तन करत असतील, तर हे सारे फोल आहे. महिलांकडे वाकड्या नजरेने पाहिल्यास कडक शिक्षा होते, हा संदेश प्रज्वलच्या निमित्ताने राजकारण्यांपर्यंत पोहोचला असेल.

# वेलवर्गीय पिकांमध्ये संजीवकांचा वापर का आणि कसा करावा, वाचा सविस्तर

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक –** वेलवर्गीय पिकांमध्ये जसे कि काकडी, कलिंगड, भोपळा यामध्ये संजीवकांचा वापर उत्पादन वाढवण्यासाठी आणि फळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी केला जातो.

**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**




संजीवके पिकांच्या वाढीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर उपयोगी ठरतात. संजीवकाचे आणखी काय फायदे आहेत, ते पाहुयात....

वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये नर आणि मादी फुले येतात.

त्यामध्ये नर फुलांचे प्रमाण जास्त आणि मादी फुलांचे प्रमाण कमी असते.

मादी फुलांपासून फळधारणा होऊन फळे मिळतात. त्यासाठी मादी फुले जास्त आणि नर फुले कमी असावी लागतात.

त्यासाठी काही संजीवकांचा वापर करता येतो.

उदा. काकडी पिकामध्ये इथ्रेल हे संजीवक १५०-२०० पीपीएम याप्रमाणे पीक दोन आणि चार पानांवर असताना फवारणी केली असता नर फुलांचे प्रमाण कमी होऊन मादी फुलांचे प्रमाण वाढते.

परंतु सध्या बाजारामध्ये काकडीच्या ज्या जाती उपलब्ध आहेत, त्यावर संजीवकाची फवारणी करू नये. कारण या जातींमध्ये फक्त मादी फुले येतात आणि संजीवकाची फवारणी केल्यास नर फुले येऊ शकतात.

हवामानाचा अंदाज लक्ष्यात घेता कोरडवाहू जमिनीच्या क्षेत्रात (मालेगाव, नांदगाव, येवला व सटाणा) वातावरणातील ओलावा संरक्षणासाठी कंपार्टमेंट बांधासारख्या संरचना तयार करा.

तसेच पडणा-या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी उपाय योजना करावी.

रांगडा कांदा लागवडीसाठी बियांची गादीवाफ्यावर पेरणी जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात करावी.

पूर्वेकडील (मालेगाव व नांदगाव) तसेच उत्तरेकडील (सटाणा व देवळा) अवर्षण प्रवण विभागात पडणा-या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी उपाय योजना करावी.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




# फक्त त्वचेसाठीच नाही, केसांसाठीही वरदान आहे कोरफड; जाणून घ्या हे ५ जबरदस्त फायदे

दि.४विदर्भ प्रजासत्ताक ५

कोरफड (एलोवेरा) म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर येते ती चमकदार आणि निरोगी त्वचा. त्वचेच्या अनेक समस्यांवर कोरफड हा एक रामबाण उपाय मानला जातो. पण तुम्हाला माहित आहे का, की ही जादुई वनस्पती केवळ त्वचेसाठीच नव्हे, तर तुमच्या केसांसाठीही एका वरदानापेक्षा कमी नाही? होय, केसांची वाढ, मजबुती आणि चमक या सर्वांसाठी कोरफड अत्यंत फायदेशीर आहे.आजकालच्या धावपळीच्या जीवनात आणि प्रदूषणामुळे केसांच्या अनेक समस्या जसे की केस गळणे, कोंडा होणे आणि केस निस्तेज दिसणे सामान्य झाले आहे. या समस्यांवर बाजारात अनेक महागडी उत्पादने उपलब्ध आहेत, पण त्यातील रसायनांमुळे केसांना नुकसानही पोहोचू शकते. अशा परिस्थितीत, कोरफड हा एक नैसर्गिक, सुरक्षित आणि प्रभावी उपाय ठरू शकतो.



**१. केसांच्या वाढीस चालना–** कोरफडीमध्ये प्रोटिओलिटिक एन्झाइम्स नावाचे विशेष घटक असतात, जे टाळूवरील मृत पेशी (वशरव ज्ञ्ळप लशश्रश्री) काढून टाकण्यास मदत करतात. यामुळे केसांची मुळे मोकळी होतात आणि नवीन केसांच्या वाढीस चालना मिळते. नियमित वापराने केस लांब आणि दाट होण्यास मदत होते.

**२. कोंड्यावर प्रभावी उपाय**

कोंडा ही एक सामान्य समस्या आहे, जी टाळूच्या कोरडेपणामुळे किंवा बुरशीजन्य संसर्गामुळे होते. कोरफडीमध्ये अँटी-फंगल आणि मॉइश्चरायझिंग गुणधर्म असतात. यामुळे टाळूची खाज कमी होते आणि कोंड्याची समस्या मुळापासून दूर होण्यास मदत मिळते.

३. नैसर्गिक कंडिशनरचे काम करतेकोरफड हे एक उत्तम नैसर्गिक कंडिशनर आहे. ते केसांमधील ओलावा टिकवून ठेवते, ज्यामुळे केस मऊ, मुलायम आणि चमकदार दिसतात. रासायनिक कंडिशनरऐवजी कोरफडीचा वापर केल्याने केसांना नैसर्गिक चमक मिळते आणि ते तुटण्याचे प्रमाणही कमी होते.

**४. टाळूचे आरोग्य सुधारते** सांचे आरोग्य हे टाळूच्या आरोग्यावर अवलंबून असते. कोरफडीमध्ये अँटी-इन्फ्लेमेटरी (दाहक-विरोधी) गुणधर्म असल्याने ते टाळूला थंडावा देते आणि खाज किंवा जळजळ कमी करते. तसेच, ते टाळूचा पीएच (कि) स्तर संतुलित ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे केसांचे आरोग्य सुधारते.

**५. केसांना मजबूत बनवते**

कोरफडीमध्ये व्हिटॅमिन ए, सी आणि ई यांसारखी आवश्यक जीवनसत्त्वे आणि पोषक तत्वे भरपूर प्रमाणात असतात. हे घटक केसांच्या मुळांना पोषण देतात आणि त्यांना मजबूत बनवतात. यामुळे केस गळण्याची समस्या कमी होते आणि केस अधिक निरोगी होतात.

# नांदगाव पेठ येथील आरोग्य उपकेंद्राची नवीन इमारत धूळखात; रुग्णांची गैरसोय

## अन्यथा सामान्य नागरिकांच्या हस्ते करू लोकार्पण-हटवार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४नांदगाव पेठ–** प्राथमिक आरोग्य केंद्र,माहुली जहागीर अंतर्गत आरोग्य उपकेंद्र नांदगाव पेठ येथे मागील वर्षी माजी आ.यशोमती ठाकूर यांच्या निधीतून एक कोटी वीस लक्ष रुपये खर्च करून उपकेंद्राची नवी इमारत तसेच आरोग्य सेविकेसाठी निवासस्थान बांधण्यात आले. इमारती तयार होऊन सहा महिने अधिक झाले मात्र तरीही ही इमारत उदघाटनाच्या प्रतीक्षेत असून धूळखात पडलेली आहे. रुग्णांची होत असलेली गैरसोय बघता पंधरा दिवसात ही इमारत खुली करण्यात यावी अन्यथा सामान्य नागरिकांच्या हस्ते या इमारतीचे उदघाटन करण्यात येईल असा इशारा माजी जि.प.सदस्य नितीन हटवार यांनी दिला आहे. गावातील आरोग्य सेवेसाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने तब्बल एक कोटी वीस लाख रुपये खर्च करून उभारलेली नवीन इमारत गेल्या अनेक दिवसांपासून धुळखात पडली आहे. आवश्यक कागदोपत्री पूर्तता न झाल्याने इमारतीचा ताबा आरोग्य विभागाला दिला गेला नाही. त्यामुळे रुग्णांना नव्या सुविधांचा लाभ मिळत नसून त्यांना जुनी व जीर्ण इमारत किंवा मर्यादित जागेत उपचार घ्यावे लागत आहेत. या संदर्भात माजी जि.प.सदस्य नितीन हटवार यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटले की, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे हे अक्षम्य दुर्लक्ष आहे. लाखो रुपये खर्च करूनही इमारत रुग्णांच्या सेवेत न आणणे हे अन्यायकारक आहे. येत्या पंधरा दिवसांत किरकोळ कामे पूर्ण करून इमारत सुरु करावी, अन्यथा ग्रामस्थांसोबत मिळून आम्हीच इमारत उघडून रुग्णांच्या सेवेत देऊ.इमारत पूर्ण असूनही केवळ कागदोपत्री विलंब होत असून आरोग्य सेवांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करून इमारतीचा ताबा आरोग्य विभागाला द्यावा, अशी मागणी नितीन हटवार यांनी केली आहे.

### जुनी इमारत धोकादायक

५० वर्षांपासून वापरात असलेली आरोग्य उपकेंद्राची जुनी इमारत सध्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असून पावसाळ्यात सर्वत्र पाणी गळतीची समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहे. इमारतीतील छत, भिंती आणि खिडक्या अशा सर्व ठिकाणी पाणी शिरल्याने कर्मचाऱ्यांसह येथे येणाऱ्या रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.

# ग्रामपंचायत भंगार विक्री प्रकरणात कर्मचाऱ्यांच्या बाजूने बहुमताने ठराव कायम

विदर्भ प्रजासत्ताकदि.४नांदगाव पेठनांदगाव पेठ ग्रामपंचायतीतील भंगार विक्री प्रकरण पुन्हा एकदा मासिक सभेत चांगलेच गाजले. ग्रामपंचायत सदस्य छत्रपती पटके यांनी मागील झालेला ठराव रद्द करून संबंधित दोन कर्मचाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र सरपंच कविता डांगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आमसभेत सरपंच, उपसरपंच यांच्यासह दहा सदस्यांनी ठराव कायम ठेवण्याच्या बाजूने मतदान करत, संबंधित कर्मचाऱ्यांना पाठीशी घालणारा निर्णय घेतला, तर केवळ पाच सदस्यांनीच ठरावाच्या विरोधात भूमिका घेतली. ग्रामपंचायतीतील जुन्या व वापरात नसलेले साहित्य ग्रामपंचायत मधील दोन कर्मचाऱ्यांनी परस्पर विकल्याचा आरोप केला गेला.

त्यानंतर ग्रामपंचायतने त्यांच्याकडून माफीनामा लिहून प्रकरणावर पडदा टाकला होता. मात्र ग्रा. पं. सदस्य छत्रपती पटके यांनी रीतसर तक्रार दाखल करून फौजदारी कारवाईची मागणी केली होती. मात्र मासिक सभेत बहुसंख्य सदस्यांनी, संबंधित कर्मचाऱ्यांनी माफी मागितल्याचे आणि पुन्हा असे कृत्य न करण्याचे लेखी आश्वासन दिल्याचे कारण देत, कारवाई न करण्याचा ठराव कायम ठेवला.

या निर्णयावर नाराजी व्यक्त करत छत्रपती पटके यांनी सांगितले की, हजारो ट्यूबलाईटमधील चक तसेच नव्याने लावलेल्या एलईडी लाईटसोबत आलेल्या लोखंडी पट्ट्या भंगारात विकण्यात आल्या. असे असताना त्यांच्यावर फौजदारी कारवाई न करता त्यांना पाठीशी घालणे अत्यंत चुकीचे असल्याचे मत छत्रपती पटके यांनी व्यक्त केले.

### ठरावाच्या बाजूने

सरपंच कविता डांगे, उपसरपंच मजहर खा, सफदर खा,श्रीधर राऊत, वृषाली इंगळे, ज्योती कुकडे, विभा देशमुख,किशोर नागापुरे,सलमा सुलताना हमिद शाह,मो. शाकिर परवेज मो.साबीर,उर्मिला गायगोले

### ठरावाच्या विरोधात

साहेबराव उर्फ छत्रपती पटके,शिवराजसिंह राठोड, बलविरसिंह चव्हाण,मंदा कापडेआशाताई चंदेल–

# पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांनी दिला 'झाडे लावा, झाडे जगवा' चा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ अमरावती–** पर्यावरण रक्षणाची जाणीव निर्माण करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये हरित संदेश रुजवण्यासाठी पी.आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल, कठोरा, अमरावती येथे नुकताच वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य श्री. सचिन दुर्गे , उपप्राचार्या सौ. सोनल निस्ताने, प्री-प्रायमरी विभागप्रमुख निलीमा केणे, तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात पर्यावरण गीताने झाली, ज्यामुळे उपस्थितांमध्ये हरितवृत्तीची प्रेरणा जागवण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात विविध प्रकारची फळझाडे व औषधी वनस्पतींची लागवड केली. या वृक्षारोपणात विशेषतः विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग लक्षात घेण्याजोगा होता. त्यांनी केवळ रोपे लावलीच नाहीत तर त्यांचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारीही स्वीकारली.प्राचार्य श्री. सचिन दुर्गे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वृक्ष हे पृथ्वीचे फुफ्फुसे आहेत. प्रदूषण रोखणे, हवामान समतोल ठेवणे, तसेच नैसर्गिक आपत्ती टाळण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या जीवनात उतरवणे गरजेचे आहे.उपप्राचार्या सोनल निस्ताने यांनीही पर्यावरण रक्षणासाठी सामूहिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी आपल्या घराच्या परिसरातही झाडे लावावीत असे आवाहन केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंदांनी परिश्रम घेतले. निसर्गप्रेम आणि सामाजिक बांधिलकी यांची जोड असलेल्या




या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी आस्था निर्माण झाली.हा वृक्षारोपण कार्यक्रम हा केवळ एका दिवशी संपणारा उपक्रम नसून, यामधून एक दीर्घकालीन सामाजिक जबाबदारीची बीजे पेरली गेली असल्याचे स्पष्ट दिसून आले.–

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ४ ऑगस्ट २०२५ शहर/ग्रामिण

## मोर्शीत मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती.....

# हत्ती प्रकरणात शासनाची भूमिका नाही

## - मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्पष्टीकरण

### संजय शिरसाट यांच्या विधानाचाही बचाव; मेघना बोर्डीकर यांच्याशी संवाद झाल्याचेही स्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४ अमरावती–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापुरातील गजराज (हत्ती) प्रकरणावर तसेच आमदार संजय शिरसाट आणि मेघना बोर्डीकर यांच्याशी संबंधित वादग्रस्त विधानांवर स्पष्ट भूमिका मांडली. अमरावतीत पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी सध्या राज्यात चर्चेत असलेल्या या तिन्ही मुद्द्यांवर सरकारचा अधिकृत दृष्टिकोन मांडला.

कोल्हापुरातील मंदिर परिसरातून हत्ती हलविण्याच्या निर्णयावरून निर्माण झालेल्या वादावर मुख्यमंत्री म्हणाले,हत्ती नेण्यासंदर्भात शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. काही तक्रारी झाल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. न्यायालयाने या प्रकरणात एक हायपॉवर समिती नियुक्त केली होती. त्या समितीच्या अहवालाच्या आधारे सर्वोच्च न्यायालयात निर्णय गेला आणि न्यायालयाने तो आदेश कायम ठेवला आहे. त्यामुळे राज्य शासनाची या प्रकरणात कुठलीही थेट भूमिका



नाही.मुख्यमंत्र्यांनी असेही स्पष्ट केले की,भाविकांच्या भावना आम्हाला महत्त्वाच्या आहेत. म्हणूनच मंगळवारी आमदारांसोबत या प्रकरणावर बैठक बोलावली आहे.

**शिरसाट यांच्या विधानावर बचावात्मक भूमिका–** शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांच्या वादग्रस्त विधानावर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले,मंत्री कधी कधी भाषणात गमतीने काही बोलतात. त्यामुळे प्रत्येक गोष्टीचा बाऊ करणे योग्य नाही. शिरसाट यांनी जे काही म्हटले, ते मला तरी चुकीचे वाटत नाही. मात्र, अशा वक्तव्यांबाबत संयम ठेवावा, असा सल्ला मी त्यांना दिला आहे.

या विधानातून मुख्यमंत्री शिरसाट यांना थेट पाठीशी घालताना दिसले, मात्र सार्वजनिक वक्तव्य करताना काळजी घेण्याची सूचनाही दिली.

### सरकारचा स्पष्ट दृष्टिकोन

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या स्पष्टीकरणामुळे राज्यात गाजत असलेल्या तीनही विषयांवर – म्हणजे हत्ती हलविण्याचा वाद, शिरसाट यांचे विधान, आणि बोर्डीकर यांचे वक्तव्य – सरकारची अधिकृत आणि स्पष्ट भूमिका समोर आली आहे.

राजकीय वातावरण तापले असताना मुख्यमंत्र्यांनी सामंजस्यपूर्ण आणि स्पष्ट भूमिका घेतल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

### मेघना बोर्डीकर यांच्याशी संवाद; मीडिया रिपोर्टिंगवर टीका

भाजपच्या महिला आमदार मेघना बोर्डीकर यांच्या विधानावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, त्यांच्याशी माझं प्रत्यक्ष बोलणं झालं आहे. त्यांच्या विधानाचं जे मीडिया रिपोर्टिंग झालं, ते अर्धवट आणि दिशाभूल करणारं आहे.फडणवीस यांच्या या वक्तव्यामुळे माध्यमांच्या भूमिकेवरही अप्रत्यक्षपणे सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

# पोषण आहार स्वयंपाकगृहात किड्यांचा वावर?

## शिक्षण खात्याचे काटेकोर निर्देश लागू!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ अमरावती –** स्वयंपाकगृह म्हणजे अन्नपूर्णेचा निवास. घरातल्या घरात एकाच खोलीस घर म्हटल्या जाणारे हे स्थळ. ते नेटके व स्वच्छ असावे म्हणून गृहिणी दक्ष असतात. कारण किडे व अन्य किटके यामुळे अन्न खराब होवू शकते. परिणामी विषबाधा अटळ. म्हणून या गृहाबाबत काळजी घेणे अनिवार्य. तीच बाब शाळेतील स्वयंपाकगृहाची.



शाळेत शिजविल्या पोषण आहारातून विषबाधा झाल्याच्या घटना राज्यात अनेक ठिकाणी घडल्या आहेत. अश्या घटना घडू नये म्हणून शालेय शिक्षण खात्याने काही मानक निश्चित केले आहे. पंतप्रधान पोषण शक्ती योजनेत अनुचित प्रकार टळावेत यासाठी ही दक्षता घेण्याचे सूचित करण्यात आले आहे.

अन्नात विषबाधा होण्यास काही घटक कारण ठरतात. बॅक्टरिया, विषाणू, परजीवी तसेच रासायनिक जंतूनाशके, अन्न संरक्षक द्रव्य, अतीप्रमाणात रंग द्रव, धाण्याची चुकीची हाताळणी व अन्य बाबी विषबाधा निर्माण करतात. ती झाल्यास मळमळ, डोकेदुखी, जुलाब, ताप, अशक्तपणा, अंगदुखी व तत्सम व्याधी होतात. म्हणून काळजी अपेक्षित. म्हणून येणाऱ्या धाण्याची तपासणी करावी, योग्य नसल्यास बदलून घ्यावे, किराणा मालाची वापरण्याची मुदत तपासावी, ती एक वर्षाची असावी, धान्य उंच जागेवर ठेवावे, स्वच्छ पेयजल, विद्यार्थ्यांची बसण्याची जागा व भांडी स्वच्छ असावी, स्वयंपाकगृह व परिसरात किडे, उंदीर, घुशी, साप, मांजर झुरळ यांचा वावर असू नये, मसाला किडमुक्त असावा अश्या सूचना आहेत. तसेच शाळा परिसरात अनधिकृत खाद्यपदार्थ विकल्या जात असल्यास त्यास प्रतिबंध केला पाहिजे. शाळेत बाहेरील संस्था स्नेहभोजन ठेवतात. त्या भोजनाचा दर्जा तपासून घ्यावा.शिक्षणाधिकाऱ्यांनी दर महिन्यास धान्य पुरवठादाराच्या गोदामास भेट देऊन तपासणी केली पाहिजे. गोदाम अस्वच्छ दिसून आल्यास पुरवठादारास समज देत ५० हजार रुपयाचा दंड आकारावा. दुसऱ्या तपासणीत परत अस्वच्छ दिसून आल्यास एक लाख रुपये दंड आकारावा.शाळेतील आहाराची प्रयोगशाळा तपासणी करावी. त्यासाठी प्रत्येक तालुक्यातील दोन शाळांची निवड करीत आहाराचे नमुने प्रयोगशाळेत पाठवावे.

प्रत्येक वर्षी जिल्ह्यातील स्वयंपाकी व मदतनीस यांची पोषण आहार अनुषंगाने प्रशिक्षणाचे आयोजन केल्या जावे. आहार तयार करण्याची पद्धत व अन्य बाबींसाठी. विषबाधेच्या काही गंभीर प्रकरणात डिहायड्रेशन तसेच स्नायू, किडनी व मुलांच्या अन्य अवयवावर वाईट परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. त्यासाठी लिस्ट्रिया, सॅल्मोनेला, रोटाव्हायरस, नोरो व्हायरस, जिआर्डिया व तत्सम बॅक्टरिया कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाले आहे. मुख्याध्यापक, शिक्षक, स्वयंपाकी, मदतनीस यांनी विषबाधा होवू नये म्हणून खबरदारी घेणे आवश्यक ठरते.

# पतीने पाच लाखांत दिली होती महिला पोलीस कर्मचाऱ्याची सुपारी

## दोन्ही हल्लेखोर अद्यापही पसार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती–** महिला पोलीस कर्मचारी आशा तायडे (धुळे) यांच्या पतीनेच दोन जणांना ५ लाखाची सुपारी दिली होती. ५० हजार रुपये अॅडव्हान्स दिला होता आणि काम झाल्यानंतर ४ लाख ५० हजार रुपये देणार होता, अशी कंबुली पती राहुल तायडे याने पोलिसांना दिली. त्यामुळे पोलीस दोन्ही हल्लेखोरांचा शोध घेत आहे. परंतु अद्यापही पोलिसांना त्याचा शोध लागला नाही. राहुल भाऊराव तायडे असे अटकेतील पतीचे नाव आहे. तर आशा राहुल तायडे (धुळे) असे मृत महिला पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे.

परस्त्रीशी असलेल्या प्रेमसंबंधात पत्नी आशा ही अडथळा ठरत असल्यामुळे राहुलने बत्नीची हत्या करण्याचा कट रचला होता. परंतु पती पोलीस कर्मचारी असल्यामुळे आणि तो एसआरपीएफ जवान असल्यामुळे गेल्या काही महिन्यापासून तो व्दिधा मनस्थित होता. तसेच ज्या विवाहित महिलेसोबत राहुलचे प्रेमसंबंध होते तिचा सुध्दा विचार त्याच्या डोक्यात होता. त्यामुळे घरी दरोडा पडल्याचा बनाव करून पत्नीची हत्या करण्याचा कट त्याने रचला. दरम्यान त्याची श्रेयश नावाच्या एका भुरट्या चोरासोबत ओळख झाली. त्यानंतर तो नेहमी त्याच्या संपर्कात राहत होता आणि दोघेही सोबत मद्य प्राशन करीत होते.तसेच राहुल त्याचा पूर्ण खर्च करीत असल्यामुळे श्रेयशचा राहुलवर विश्वास बसला. त्यानंतर पत्नीचा खुप त्रास आहे, ती नेहमी त्रास देते, असे सांगून त्याने श्रेयशला आपल्या बाजुने करून घेतले आणि पत्नीचा खून करण्याचा कट रचला. तसेच या



कामासाठी म्हणून ५ लाख रुपये देण्याचे ठरले. ठरल्याप्रमाणे पतीने श्रेयशला अॅडव्हान्स ५० हजार रुपये दिले. त्यानंतर त्यांनी पत्नीची हत्या केल्याची कबुली एसआरपीएफ जवान राहुल तायडेने दिली. त्यामुळे पोलीस दोन्ही हल्लेखोऱ्यांच्या शोधात आहेत. परंतु अद्यापही त्यांचा पोलिसांना शोध लागला नाही. तसेच फ्रेजरपुरा पोलिसांनी राहुल तायडे यांच्या घरी राहणाऱ्या भाडेकरू व शेजाऱ्यांचे बयाण नोंदविले. घरात शिरलेल्या दोन्ही हल्लेखोरांबाबत चौकशी केली तसेच घटनेनंतर काय झाले याबाबत सर्वांचे बयाण नोंदविले आहे.

### त्या महिलेबाबत घेत आहेत माहिती

राहुलचे ज्या महिलेसोबत प्रेमसंबंध आहे, त्या महिलेचा आशाच्या हत्यामध्ये काही संबंध आहे का? तिने राहुलला हत्या करण्याकरिता प्रोत्साहित केले का? याबाबतसुध्दा पोलीस चौकशी करीत आहेत. महिलेचा काही संबंध आल्यास पोलीस तिच्यावरसुध्दा कारवाई करणार आहेत.

### ५० हजारांचा दिला अॅडव्हांस

पत्नीची हत्या करण्याकरिता राहुल तायडेने दोन मित्रांना पाच लाख रुपयांत सुपारी दिली होती. ५० हजार रुपये आधी दिले होते आणि काम झाल्यानंतर ४ लाख ५० हजार रुपये देणार होता. तसेच दरोडा टाकण्याचा बनाव केल्याचे स्पष्ट झाले आहे. कारण त्याच्या घरातच सर्व सोन्याचे दागिने मिळून आले.

**निलेश गावंडे, दुय्यम पोलीस निरिक्षक, फ्रेजरपुरा.**

# सक्षम मानव संसाधनातून विकसित भारताचे स्वप्न साकारणार– पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

### विधवा, परितक्त्या महिलांना शिलाई मशीनचे वितरण, जिल्हा कोषागार कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहाचे उद्घाटन




**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ अमरावती–** भारत देश हा युवा संसाधनाने समृद्ध आहे. भारतासारख्या संस्कारित मानव संसाधनाची जगाला गरज आहे. सक्षम युवा संसाधन निर्मिती करणे ही सामाजिक जबाबदारी असून याव्दारे विकसित भारत–२०४७ स्वप्न साकारले जाणार असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले.



महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा संघटनेव्दारे मातोश्री विमलाताई देशमुख समागृह येथे समाज मेळावा, समाजभूषण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच महिलांना शिलाई मशीनचे वितरण आज करण्यात आले. यावेळी आमदार प्रताप अडसड, रामदास तडस, नवनीत राणा, संजय हिंगासपूरे, शंकरकाका हिंगासपूरे, भुषण कर्डीले, संध्या सव्वालाखे, डॉ. मोनीका मांडवे, शिक्षण उपसंचालक निलीमा टाके तसेच तैलिक समाज संघटनेचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, रोजगार निर्मिती प्रक्रियेला प्रोत्साहन देणे, उत्कृष्ट काम केलेल्यांचा गौरव करणे तसेच समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे अशा कार्यक्रमामुळे समाजात चांगले काम करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळते. अशा स्वरूपाचे कार्यक्रम आयोजित करून समाज बांधवांना प्रोत्साहन द्यावे. संघटीत समाज हा देशाच्या ऐक्याचा पाया रचतो. त्यामुळे समाजाने संघटीत होऊन समाजाच्या सर्वांगिण उध्दारासाठी प्रयत्न करावे. जगातील जवळपास ११० देशातील नागरिकांचे आयुर्मान हे ४० ते ४५ या वयोगटातील असून ते देश आज वृद्धत्वाकडे झुकलेले आहेत. अन्य देशांकडे काम करण्यासाठी पुरेशी सक्षम युवा पिढी नाही.त्यांना सर्वच क्षेत्रात उत्तम काम करणाऱ्या मानवसंसाधनाची आवश्यकता आहे. त्यांची ही गरज पूर्ण करण्याची क्षमता आपल्या देशातील युवा पिढीकडे आहे. यामुळे आपल्याकडील युवा पिढीला जगातील सर्वच क्षेत्रात रोजगाराची अनेक नवीन दालने खुली आहेत. यासाठी नवतंत्रज्ञानाचे शिक्षण घेतलेला उच्चशिक्षा विभूषित व संस्कारी युवावर्ग जगाला पुरवण्याची जबाबदारी भारत देश पूर्ण करु शकतो. सक्षम युवा संसाधन निर्मिती करणे ही सामाजिक जबाबदारी आहे. आजची युवा पिढी व्यसनापासून दूर राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे ते यावेळी म्हणाले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'विकसित भारत २०४७' घडविण्यासाठी आतापासून नियोजन सुरू केले आहे. विकसित भारताचा संकल्प हा समाजाच्या विकासाचा संकल्प आहे. विकसित भारताला लागणारे उच्च विभूषित मानवसंसाधन निर्माण करण्यासाठी उच्च शिक्षीत समाजाची निर्मिती करण्याची गरज आहे. शिक्षणानेच समाज संस्कारक्षम होऊन सर्व क्षेत्रात प्रगती साध्य करु शकतो. युवा पिढी सर्वगुण संपन्न होण्यासाठी राज्यात आयआयएम, आयआयटी, एनआयटी यासारख्या नामांकीत संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत. समाजातील सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनींनी याठिकाणी प्रवेश मिळविण्यासाठी परिश्रम घ्यावे. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजना पोहचणे आणि या विकासगंगेत सर्वांचा समावेश असणे हे विकसित भारताचे ध्येय आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करणे गरजेचे असल्याचे पालकमंत्री श्री. बावनकुळे यावेळी म्हणाले.यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते तैलिक समाजातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. इयत्ता दहावी, बारावीत गुणवंत विद्यार्थी–विद्यार्थीनींचा शालेय साहित्य वितरण करुन गौरव करण्यात आला.

### जिल्ह्यातील विकास प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देणार– पालकमंत्री

जिल्ह्यातील विकास प्रकल्पांना पूर्ण करण्यासाठी भरीव निधी उपलब्ध करुन दिला जाईल, असे आश्वासन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी दिले. जिल्हा कोषागार कार्यालयाच्या परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या सर्व सुविधायुक्त 'जिजाऊ सभागृहा'चे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार सुलभाताई खोडके यांच्या हस्ते आज करण्यात आले.जिल्हा नियोजन योजनेतून ६८ लाख खर्च करुन जिजाऊ सभागृह बांधण्यात आले आहे. या सभागृहात लेखा व कोषागार विभागाव्दारे राबविण्यात येणाऱ्या नवीन प्रणालीचे प्रशिक्षण, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी त्रैमासिक सभा, आरोग्य शिबीर, योग–प्राणायम शिबीरे घेण्यात येतील. यावेळी आमदार संजय खोडके, आमदार प्रताप अडसड, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, लेखा व कोषागारे सह संचालक प्रिया तेलकुंटे, वरिष्ठ कोषागार अधिकारी शिल्पा पवार, सहाय्यक संचालक (निवृत्ती वेतन) अमोल ईखे यांच्यासह लेखा व कोषागारे विभागाचे अधिकारी–कर्मचारी आदी उपस्थित होते.

# विद्याभारती महाविद्यालयात प्राध्यापकांसाठी दोन दिवसीय अध्यापन कौशल्यविकास कार्यशाळा

विदर्भ प्रजासत्ताकदि.४अमरावती बातमी मोठी घेणे फोटो ३ कॉलम ९विद्याभारती शैक्षणिक मंडळ, अमरावती व अंतर्गत मूल्यमापन कक्ष ( आयक्युएसी) च्या संयुक्त विद्यमाने येथे दि.२ व ३ ऑगस्ट २०२५ रोजी विद्याभारती महाविद्यालय व विद्याभारती फार्मसी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांसाठी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्याभारती शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. रावसाहेब शेखावत यांच्या दृष्टिकोनातून आजच्या काळातील शिक्षक अधिकाधिक व्यावसायिक कौशल्यांनी परीपूर्ण असावा. या हेतुने ही कार्यशाळा घेण्यात आली. टीएमसी, मुंबई सीटीएमसी,जॉब स्कील केडमीचे संचालक डॉ. चंद्रकांत शर्मा यांनी ह्या कार्यशाळेत मार्गदर्शन केले.कार्यशाळेचा उद्देश शिक्षण प्रक्रियेत गुणवत्ता वृद्धिंगत करणे, अध्यापन कौशल्ये विकसित करणे, नव्या तंत्रज्ञानाशी शिक्षकांना परिचित करणे, तसेच अध्यापन आणि अध्ययन प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर उपाय शोधणे हा होता. कार्यशाळेचे उद्घाटन विद्याभारती शैक्षणिक मंडळाच्या उपाध्यक्ष मेजर डॉ. एम.एम. राठौर यांनी केले. अध्यक्ष म्हणून विद्याभारती महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर तसेच विद्याभारती फार्मसीचे प्राचार्य डॉ.एस.डी.पांडे व्यासपीठावर उपस्थित होते. उद्घाटनपर मार्गदर्शन करतांना डॉ.एम.एम राठौर यांनी शिक्षकांमध्ये प्राविण्य आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी या कार्यशाळेचे महत्त्व विशद केले.कार्यशाळेमध्ये भावनिक बुद्धिमत्ता, नैतिक मूल्य नेतृत्व व संघटन कौशल्ये, वैयक्तिक क्षमता विकास, निर्णय पद्धती, तणाव वेळेचे व्यवस्थापन, संवादात विनोदाचा वापर या विषयाच्या अनुषंगाने विविध क्षेत्रातून संवादात्मक चर्चा झाली.



या कार्यशाळेत डॉ. चंद्रकांत शर्मा यांनी विविध सत्रांमधून शिक्षकांशी संवाद साधला. त्यांच्या व्याख्यानांची मांडणी आधुनिक शिक्षणतंत्र, अध्यापन कौशल्ये, ई–लर्निंग,एनईपी २०२० चा प्रभाव, तसेच मूल्याधारित शिक्षण या विषयांवर आधारित होता. डॉ. शर्मा यांनी प्राध्यापकांच्या भूमिकेवर भाष्य करताना सांगितले की, आजच्या काळात शिक्षक म्हणजे केवळ माहिती देणारा व्यक्ती नसून तो मार्गदर्शक, सल्लागार, प्रेरणास्थान आणि शोधक बनला पाहिजे. शिक्षण क्षेत्रात झपाट्याने होणाऱ्या बदलांशी जुळवून घेत शिक्षण देणे ही काळाची गरज आहे.त्यानंतर त्यांनी विविध सत्रांमध्ये सहभागींना सर्जनशीलता, संवादकौशल्य, ई–माध्यमांचा वापर, अभ्यासक्रम संकल्पना, गुणवत्ता मूल्यांकन प्रणाली, विद्यार्थी–केंद्रित अध्यापन तंत्र यांची सखोल माहिती दिली. दोन दिवसांत एकूण चार शैक्षणिक सत्रांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रात्यक्षिकांसह व्याख्याने, समूहचर्चा, प्रश्नोत्तर सत्र यांचा समावेश होता.या सत्रांमध्ये सहभागी शिक्षकांनी आपले अनुभव मांडले, प्रश्न उपस्थित केले आणि सक्रिय सहभाग दिला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात असे नमूद केले की, विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास हे केवळ दर्जेदार शिक्षणामुळेच शक्य होते. त्यासाठी शिक्षकांनी आपल्या अध्यापन शैलीत सतत नाविन्य आणणे आवश्यक आहे. ही कार्यशाळा हेच उद्दिष्ट पूर्ण करते.त्यांनी कार्यशाळेतील महत्त्वाच्या मुद्द्यांवर भर देत शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा अभ्यास करून अध्यापन करावे, असे सांगितले. त्यांनी महाविद्यालयात सातत्याने गुणवत्ता वृद्धीसाठी राबवले जाणारे उपक्रमाबद्दल अवगत केले. आयक्युएसी समन्वयक डॉ. पी. जी बनसोड यांनी कार्यशाळेचा आढावा घेत धन्यवाद प्रस्ताव सादर केला. तांत्रिक सहाय्य करणारे तसेच आयोजन समितीमधील सदस्यांचे आणि इंग्रजी विभागप्रमुख डॉ. व्ही. पी. शेकोकार आणि विभागातील सर्व सहकाऱ्याचे विशेष कौतुक करण्यात आले. दोन्ही महाविद्यालयातील सर्व विभागातील शिक्षकांनी कार्यशाळेला भरभरून प्रतिसाद दिला.

# सुरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत ‘आनंदाचा एक तास’ उपक्रम उत्साहात साजरा

## अक्षर मानव संघटना आणि आझाद व्यवसाय सुविधा केंद्र तिवसा यांचा संयुक्त उपक्रम

### विद्यार्थ्यांना फळांचे वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४तिवसा** – सामाजिक बांधिलकी जपत आणि विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याच्या उद्देशाने सुरवाडी खुर्द येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेत ’आनंदाचा एक तास’ हा उपक्रम उत्साहात पार पडला. अक्षर मानव संघटना, अमरावती जिल्हा कार्यकारिणी आणि आझाद व्यवसाय सुविधा केंद्र, तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.

या उपक्रमाचे औचित्य होते अक्षर मानव संघटनेचे कोषाध्यक्ष अनिल भाऊ मेंढे यांच्या वाढदिवसानिमित्ताचे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. दलवीर व्यास होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून अक्षर मानव संघटनेचे राज्य संघटक आणि विदर्भाचे पालकमंत्री श्री. आझाद खान यांनी उपस्थिती लावली.

उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करण्यात आले. तसेच, मुलांबरोबर गाणी, गोष्टी, खेळ, व्यायाम आणि नृत्य यासारखे विविध आनंददायी उपक्रम पार पडले. ‘आनंदाचा एक तास’ या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासाला चालना देण्याचे काम अक्षर मानव संघटना करत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात हा उपक्रम शाळा, वस्ती, संस्था अशा विविध ठिकाणी राबवला जात आहे.

मुख्याध्यापक व्यास सरांनी शाळेच्या प्रगतीची माहिती देताना सांगितले की, शाळेने अनेक शैक्षणिक पुरस्कार पटकावले असून, ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे परिसर सुंदर बनवण्यात आला आहे. अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. त्यांनी अनिल मेंढे यांच्या कार्याचे विशेष कौतुक करत इतर पालकांनीही प्रेरणा घ्यावी असे मत व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे आझाद खान यांनी अक्षर मानव संघटनेच्या कार्याची माहिती देत सांगितले की, ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्था ९६ मानवी क्षेत्रांमध्ये कार्यरत असून, मानवतेच्या विकासासाठी समर्पित आहे.




आनंदाचा एक तास उपक्रम मुलांमध्ये सकारात्मकता आणि सामूहिकतेची भावना निर्माण करतो.

या वेळी सौ. संध्या जांबकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन प्रा. शिवाजी कोकाटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अक्षर मानवच्या जिल्हा सचिव सौ. अश्विनी वितोडे-खान यांनी केले.या उपक्रमासाठी अनिल मेंढे, शिवाजी कोकाटे, दलवीर व्यास, संध्या जांबकर, संध्या मेंढे, शुभांगी झटाळे, अश्विनी वितोडे, सारिका कोकाटे या सर्वांनी परिश्रम घेतले. गावकऱ्यांनीही उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.-

# विद्यार्थ्यांचा एसटी आगारात धडक मोर्चा

## चांदूर रेल्वे ते नांदगाव खंडेश्वर बसफेरी वेळेवर सुटावी अशी मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती-** चांदूर रेल्वे येथील विद्यार्थ्यांनी बसफेरी वेळेवर सुटावी या मागणीसाठी एसटी आगारात धडक दिली. राजुरा ग्रामपंचायत सदस्य तथा अखिल भारतीय सरपंच परिषदेचे जिल्हा समन्वयक भूषण काळे यांच्या नेतृत्वात हा मोर्चा आयोजित करण्यात आला.

चांदूर रेल्वे आगारातून नियमित सुरू असणारी बस सेवा नियोजित वेळेवर सुटत नसल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. विद्यार्थी सकाळपासून शाळेसाठी घरून येतात. परंतु सायंकाळी ५.३० वाजताची चांदूर रेल्वे ते नांदगाव खंडेश्वर बसफेरी वेळेवर न सुटल्याने त्यांना घरी पोहोचायला रात्री उशीर होतो.

या समस्येला वाचा फोडण्यासाठी विद्यार्थी थेट आगार प्रमुखांच्या कार्यालयात गेले. त्यांनी बसफेऱ्या नियोजित वेळेवर सोडण्याची मागणी केली. या आंदोलनात राजुरा ग्रामपंचायत सदस्य भूषण काळे, सामाजिक कार्यकर्ते सौरभ इंगळे यांच्यासह अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते.

भूषण काळे यांनी सांगितले की, शाळा सुटल्यानंतर सायंकाळी घरी परत जाताना नियोजित वेळेवर बसफेरी न सुटल्याने विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. विद्यार्थ्यांना घरी पोहोचायला रोज उशीर होत असून या कारणामुळे पालकवर्ग चिंतेत आहेत. यामुळे अभ्यासावरही परिणाम होत आहे. त्यांनी आगार व्यवस्थापकांना त्वरीत याची दखल घेऊन बसफेरी नियोजित वेळेवर चालवण्याची मागणी केली आहे.

# मोर्शीच्या एकता नगरात डुकरांचा सैराट!

## नगरपरिषदेची झिंग झिंग झिंगाट!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मोर्शी** – एकता नगर येथील नागरिक सध्या अस्वच्छता आणि डुकरांच्या विळख्यात अडकले असून, नगरपरिषदेच्या उदासीनतेमुळे ते प्रचंड त्रस्त झाले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून या परिसरात डुकरांचा सैराट वावर सुरू असून, नाल्यांची सफाईही पुन्हा कधी झाली हे नागरिक विसरले आहेत.या अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, परिसरात दुर्गंधी आणि रोगराईचा संभाव्य धोका निर्माण झाला आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाचा सुर वाढत असून, त्यांनी नगरपरिषदेला १० दिवसांची मुदत दिली आहे.आम्ही अनेक वेळा नगरपरिषदेला तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, असा आरोप येथील स्थानिक नागरिकांनी केला आहे.नगरपरिषद कुंभकर्णाच्या झोपेत असल्यासारखी वागत असून, एकता नगरातील वाढती घाण आणि डुकरांचा त्रास याकडे सातत्याने दुर्लक्ष करत आहे. जर दहा दिवसांच्या आत परिसर स्वच्छ करण्यात



आला नाही आणि डुकरांचा बंदोबस्त करण्यात आला नाही, तर जनहितासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा एकता नगरातील नागरिकांनी दिला आहे.

# दर्यापूरमध्ये सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा उत्साहात संपन्न

## सामाजिक ऐक्याचा अनोखा आदर्श निर्माण

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४ दर्यापूर** – समाजात समता, सलोखा व बंधुतेचा संदेश देणारा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी दर्यापूर येथील कृषी भवन येथे उत्साहात पार पडला. विविध धर्मीय वधू-वरांनी एकाच मंचावर विवाहबद्ध होत समाजात सामाजिक ऐक्याचा अनोखा आदर्श घालून दिला.

हा विवाह सोहळा समाजकल्याण विभाग, अमरावती, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, अमरावती, तसेच मणिषा ज्ञानप्रकाश बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. संजय चोरपगार (जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, अमरावती) यांनी भूषवले. उद्घाटन सामाजिक कार्यकर्त्या कमलजीत कौर मॅडम यांच्या हस्ते संपन्न झाले.

विवाह विधी पारंपरिक रितीने, अत्यंत साधेपणाने पार पडले. वधू-वरांना त्यांच्या धर्मानुसार विधी पार पाडण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. विवाहानंतर



नवविवाहित जोडप्यांना घरगुती उपयुक्त साहित्य भेटस्वरूप देण्यात आले. यात भांडी, गादी, डबे, ब्लँकेट्स, आणि आवश्यक दैनंदिन वस्तूंचा समावेश होता.या उपक्रमात अमर्दीप सदाशिव, राहुल तायडे, नरेंद्र डोंगरे आणि संदेश कुळखे यांचे विशेष योगदान होते. त्यांच्या पुढाकारातूनच हा उपक्रम शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला.कार्यक्रमस्थळी दर्यापूर परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्था प्रतिनिधी, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी विवाह सोहळ्याचे भरभरून कौतुक केले. धर्म, जात, वर्ग, पंथ यापलीकडे जाऊन समाजात ऐक्याची भावना वृद्धिंगत करणारा हा विवाह सोहळा एक प्रेरणादायी उदाहरण ठरतो, अशा भावना अनेक मान्यवरांनी व्यक्त केल्या.हा सामूहिक विवाह सोहळा केवळ नवविवाहित जोडप्यांसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी सामाजिक सलोखा व एकतेचे प्रतीक ठरला आहे. पुढील काळातही अशा कार्यक्रमांची गरज असून, प्रशासन व सामाजिक संस्थांनी अशा उपक्रमांना पाठबळ द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त करण्यात आली.--

# दोन दिवसांत ४.२६ कोटींची कर वसुली

## मनपाचे दोन दिवस वसुली शिबिरांचे आयोजन; नागरिकांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती-** महानगर पालिकेद्वारे शनिवार २ व रविवार ३ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या झोननिहाय मालमत्ता कर वसुली शिबिरांना नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. दोन दिवसांत एकूण ४.२६ कोटी रु. मालमत्ता कराची विक्रमी वसुली करण्यात आली असून, याद्वारे शहरवासीयांनी आपली करदायित्वाची भावना अधोरेखित केली आहे. त्यामुळे आता प्रशासनाच्या या शिबिराच्या माध्यमातून मालमत्ता कर वसुलीच्या कामला वेग आला आहे. यातूनच दोन दिवसांमध्ये मोठी वसुली प्रशसनाला करता आली आहे. याला परिसरातील नागरिकाचाही प्रतिसाद मिळत असल्याचे दिसते.



शनिवार २ रोजी १.६० कोटी रु. तर रविवार ३ रोजी २.६६ कोटीअशी एकूण ४.२६ कोटी रुपयांची वसुली शिबिरांच्या माध्यमातून झाली आहे. या शिबिरात मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांना १० टक्के सवलत, तसेच ऑनलाईन पेमेंटवर ३ टक्के अतिरिक्त सवलत देण्यात आली होती. नागरिकांनी या सवलतींचा मोठ्या प्रमाणात लाभघेतला. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या नेतृत्वात हे शिबिर अत्यंत प्रभावीपणे पार पडले. अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, योगेश पिठे, तसेच अधिकारी घनश्याम वाघाडे, श्यामसुंदर देव, दत्तात्रय फिस्के, रवींद्र पवार, अमित डेंगरे, सुहास चव्हाण, प्रकाश मेश्राम, श्रीकांत चव्हाण, विशाल काळे, कांचन भावे, डॉ. सचिन बोन्द्रे, लक्ष्मण पावडे, अजय जाधव, संतोष केंद्रे यांनी विविध ठिकाणी शिबिराचे नियंत्रण व मार्गदर्शन केले. झोनचे सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तीखीले, भूषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, तसेच सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी केशव ठाकरे, नर्मदा चव्हाण, नरेंद्र देवरणकर, संजय निकम, विजय भातकुलकर, वसुली निरीक्षक, मालमत्ता कर वसुली लिपिक व स्थापत्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

> जन जागृतीवर अधिक भर महानगरपालिकेने शिबिर यशस्वी व्हावे यासाठी आयईसी मोहीम राबवली. सिटी बस जाहिराती, व्हॉट्सअॅप संदेश, केबल टीव्ही, फ्लेक्स-बॅनर, प्रसारमाध्यमे यांचा प्रभावी उपयोग करून व्यापक प्रचार व जनजागृती केली. त्यामुळे नागरिकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला.

# हिऱ्याच्या अंगठीसह १० लाखांचे दागिने लंपास

## राजापेठ बसस्थानकावरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती** -राजापेठ बसस्थानकावर बसमधून उतरत असताना गर्दीचा फायदा घेवून एका महिलेच्या बॅगमधून तब्बल ११७ ग्रॅम (बाजार भावानुसार १० लाख रूपये) सोन्याचे दागिने लंपास करण्यात आले आहे. यामध्ये हिऱ्याची ३ ग्रॅम वजनाची अंगठी सुध्दा आहे. ही चोरी दोन ऑगस्टला सायंकाळी झाली आहे. या प्रकरणी महिलेने त्याच दिवशी रात्री तक्रार दिली. तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञात महिलेविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.तक्रारदार महिला काही दिवसांपूर्वी माहेरी यवतमाळ येथे गेल्या होत्या. त्या माहेरी जाताना घरी कुणी नसल्याने त्यांनी ते ११७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एका पर्समध्ये ठेवून ते सोबत घेतले. या दागिन्यांमध्ये ४० ग्रॅमचे मंगळसुत्र, ५ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या बांगड्या, २८ ग्रॅम सोन्याचा बकुळी हार, ४ ग्रॅमची लालखडा असलेली सोन्याची, २ ग्रॅम मोतीची व ३ ग्रॅम हिऱ्याची अंगठी, एक ग्रॅम हिऱ्याची कर्णफुले, ४ ग्रॅमचे कानातले अशा दागिन्यांचा समावेश होता. हे सर्व दागिने खांद्याला अडकवणाऱ्या लाख ९५ हजार रुपये चोरीला गेल्याची नोंद केली आहे.

कलर बॉक्स)बस मध्ये बाजूला बसलेल्या महिलेनेच केला गेमदरम्यान २ ऑगस्टला दुपारी त्या यवतमाळ येथून यवतमाळ ते क्रूड बसमध्ये अमरात्तीला परत येण्यासाठी निघाल्या होत्या. त्यावेळी बसमध्ये त्यांत बाजुला तोंडाला स्कार्फ बांधलेली एक महिला बसली होती. बस राजापेठ बसस्थानकावर आल्यानंतर तक्रारदार महिला उतरली. त्यावेळी प्रचंड गर्दी होती. खाली उतरल्यानंतर तक्रारदार महिला ऑटोने जयस्तंभ चौकात गेल्या. तेथे गेल्यावर त्यांनी पतीला फोन लावण्यासाठी मोबाईल काढण्यासाठी खांद्यावरील पर्स त्यांनी हाती घेतली. तेव्हा पर्सची चेन उघडी दिसली. मात्र पर्समधील दागिने दिसून आले नाही. ते सोन्याचे दागिने बसमध्ये आपल्या बाजुला बसलेल्या अनोळखी महिलेने चोरून नेले, अशी तक्रार त्या महिलेने केली आहे.

# सनातन धर्मावरून राजकीय रणधुमाळी; नितेश राणेंचा जितेंद्र आव्हाडांवर तीव्र पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ मोर्शी** – सनातन धर्मावर केलेल्या कथित वादग्रस्त वक्तव्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड सध्या टीकेच्या केंद्रस्थानी आहेत. याच पार्श्वभूमीवर





राज्य सरकारमधील मंत्री नितेश राणे यांनी अमरावतीत पत्रकारांशी संवाद साधताना आव्हाडांवर घणाघात केला.राणे यांनी आव्हाडांना उद्देशून गंभीर आरोप करत म्हटले की,ते जिहाद्यांना खूश करण्यासाठी सनातन धर्माला अपशब्द वापरतात. त्यांच्या मतदारसंघातच जिहाद्यांचा अड्डा आहे, त्यांचं समाधान करण्यासाठीच आव्हाड अशा प्रकारची विधाने करतात.त्यांनी धर्माच्या संदर्भात अधिक परखड सवाल उपस्थित करत म्हटले कोणत्याही मुस्लिम किंवा ख्रिश्चन नेत्याने आपल्या धर्माबाबत कधी अपमानास्पद वक्तव्य केलं आहे का? मग जितू उद्दीन (जितेंद्र आव्हाड) कोणत्या अधिकाराने सनातन धर्मावर टीका करतात?राणे पुढे म्हणाले की,दु:ख याचं आहे

# श्रावण महिन्यात श्रीनाथ सखा साधक बंधूंकडून दररोज श्री रुद्र पाठ

## शशांक देशपांडे यांच्या घरी पार पडला अध्यात्मिक कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४दर्यापूर-** श्रावण महिना म्हणजे भक्तिभाव, उपासना आणि अध्यात्मिकतेचा महिमा असलेला पवित्र कालावधी. याच पार्श्वभूमीवर दर्यापूर येथील ‘श्रीनाथ सखा साधक वृंद’ या अध्यात्मिक मंडळातर्फे श्रावण महिन्याभरात दररोज सायंकाळी वेगवेगळ्या साधकांच्या घरी ‘श्री रुद्र पाठ पूजन’ कार्यक्रम पार पडतो. विशेष म्हणजे या सेवाकार्यात कोणताही मोबदला न घेता, निःस्वार्थ भावनेतून साधक हे कार्य सातत्याने करीत आहेत.

दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत साधकांचे संकीर्तन, रुद्र पाठ आणि पूजन पार पडते. त्यानंतर सर्व उपस्थित भाविकांसाठी उपवासाचे फराळ तसेच दूधाचे वाटपही करण्यात येते.दिनांक २ ऑगस्ट रोजी हा पवित्र कार्यक्रम श्री शशांक देशपांडे यांच्या निवासस्थानी भक्तिभावात संपन्न झाला. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने साधक व श्रद्धाळू भाविक उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीमध्ये शिरीष गणोरकर, कौस्तुभ गणोरकर, आनंद लाखे, श्रीधर कंठे, लक्षेश्वर होले, प्रकाश मुंशी, मोहन पन्नासे, साकेत महाजन, केने पाटील, भास्कर मोरस्कर, केशव दंडवते,



पराग दंडवते, विद्यानंद चिंचाळे, ओम चिंचाळे, श्रीवल्लभ देशपांडे, परिमल नळकांडे, प्रदीप मलिये, धनंजय धांडे, गजानन देशमुख, डॉ. विकास उफाळे आणि अशोक अग्रवाल यांचा समावेश होता.

# अमरावती जिल्ह्यात पांदन रस्त्याची वाट बिकट, शेतकऱ्यांना त्रासदायक परिस्थिती!

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४ अमरावती** ४अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील अनेक भागांमध्ये आजही शेतीसाठी आवश्यक असलेल्या पांदन रस्त्यांचा अभाव जाणवतो आहे. शासनाच्या आश्वासनानंतरही प्रत्यक्षात काहीच न होता शेतकऱ्यांची अवस्था आजही तशीच बिकट राहिली आहे.

शेतीचा हंगाम सुरु असताना शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांना किचकट आणि चिखलयुक्त मार्गांचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात या रस्त्यांवरून बैलगाड्या, ट्रॅक्टर अथवा इतर वाहने चालवणे अत्यंत कठीण होते. त्यामुळे वेळेवर मशागत किंवा पेरणी



करता येत नाही. याचा थेट परिणाम पिकाच्या उत्पादनावर होतो, ज्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागतो.राज्याचे महसूल मंत्री आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकत्याच एका कार्यक्रमात शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पांदन रस्ते युद्धपातळीवर बांधण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. मात्र दर्यापूर तालुक्यातील प्रत्यक्ष स्थिती पाहता हे आश्वासन फक्त कागदावरच राहिले असल्याचे चित्र आहे.दर्यापूर तालुक्यातील गावांमध्ये स्थानिक शेतकऱ्यांनी आमच्या शेतांपर्यंत पोहोचवणाऱ्या रस्त्यांशिवाय शेतीचे नियोजन करणे अशक्य आहे. पावसाळ्यात तर आम्ही अक्षरशः शेतापर्यंत पोहचू शकत नाही. अशा भावना व्यक्त केल्या.या पार्श्वभूमीवर शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन, त्वरित पांदन रस्ते उभारणीसाठी निधी मंजूर करून कामांना गती द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.-

# जंगलातून वाटा काढत तपोवनेश्वराच्या दर्शनाकरिता भाविकांची गर्दी

## दुसऱ्या श्रावण सोमवार निमित्य भाविकांची मंदिरात गर्दी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

श्रावण महिन्यात प्रत्येक शिव मंदिरात भाविक मोठ्या संख्येनं शिवलिंगाचं दर्शन घेतात. अमरावती शहरापासून अवघ्या १५ किलोमीटर अंतरावर पोहरा येथील घनदाट जंगल परिसरात तपोवनेश्वर या प्राचीन मंदिरात श्रावण महिन्यात जागृत शिवलिंगाच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या श्रद्धेनं येतात. यावर्षीच्या पहिल्याच सोमवारी भाविकांची गर्दी उसळली आहे.

अमरावती ते चंदूर रेल्वे मार्गावर पोहरा जंगल परिसरातून डाव्या बाजूला बोडना गावाकडं वळल्यावर पहाड आणि हिरव्यागार जंगलानं वेढलेल्या परिसरात असणाऱ्या मंदिरात श्रावण महिन्याला सुरुवात होताच शुक्रवापासून भाविक तपोवनेश्वराच्या दर्शनाला येत आहेत. यामुळं नीरव शांतता असणाऱ्या या जंगल परिसरात मंदिरातील घंट्यांचा नाद परिसरात दूरपर्यंत ऐकायला येतो आहे.

श्रावण महिन्याला सुरुवात होताच तापोवनेश्वर येथील महादेवाला अभिषेक करण्यात आला. पहिल्या सोमवारी पहाटे पाच वाजल्यापासून भाविक दर्शनाला आलेत. सकाळीच शिवलिंगपूजन,अभिषेक आरती करण्यात आली. आज दिवसभर मंदिर परिसरात भाविकांची यात्रेत गर्दी उसळणार आहे. शनिवारी आणि रविवारी अमरावती शहरातील अनेकांनी मंदिरात महापूजा करून महाप्रसाददेखील भाविकांना वितरीत करण्यात आला. सोमवारी महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांची जशी गर्दी उसळली तशीच गर्दी आता महिनाभर दररोज मंदिर परिसरात पाहायला मिळणार आहे. अनेक जण खास डबा पार्टी करण्यासाठी जंगल परिसरात असणाऱ्या या मंदिरात श्रावण महिन्यात येतात.

**तपोवनेश्वरबाबत अशी आहे आख्यायिका**

पौराणिक कथेनुसार अयोध्येचा राजा दशरथाला तीन पत्नी असताना त्यांना मुलबाळ होतं नव्हतं. यामुळं चिंतेत असणाऱ्या दशरथ राजाला त्यांचे राजगुरू वशिष्ठ ऋषी यांनी कामेष्ठी यज्ञ करण्याचा सल्ला दिला. कामेष्ठी यज्ञ करण्यासाठी दशरथ राजानं तपोवनेश्वर येथील शृंगी ऋषी यांना आमंत्रित केलं. राजा दशरथाची आई इंदुमती ही विदर्भातील कुंडलीपूर अर्थात आजचे तिवसा तालुक्यातल्या कोंडण्यपूर येथील होत्या. शृंगी ऋषी हे त्यांचे कुंडलपूर राज्याचे राजगुरू होते. शृंगी ऋषी यांना हे आमंत्रण मिळताच ते अयोध्येला गेलेत. त्यांनी कामेष्ठी यज्ञ राजा दशथाकडून करून घेतला. हा यज्ञ केल्यामुळंच दशरथ राजाला राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न ही चार मुलं झालीत अशी आख्यायिका असल्याची माहिती तपोवनेश्वर मंदिर संस्थांचे व्यवस्थापक दादाराव चौधरी यांनी दिली.

शिवलिंगाच्या मंदिरालगत शंकर आणि पार्वतीची काळ्या दगडत कोरलेली प्राचीन मूर्तीचं दर्शन होतं. यासोबतच या काळ्या दगडात गणपती आणि कार्तिकेय यांची मूर्तीदेखील आहे. या मूर्तींच्या बाजूला नंदीचंदेखील दर्शन घडतं. अतिशय जुन्या आणि काळ्या दगडात या मूर्ती असून त्यांची स्थापना खुल्या आकाशाखाली आहे. यासोबतच थोड्या अंतरावर हनुमान मंदिर, विष्णू आणि महालक्ष्मी मंदिर असून बाजूलाच भैरवाचं मंदिरही आहे.

**शिवलिंगाचं असं आहे वैशिष्ट्य**

तपोवनेश्वर येथीला शिवलिंगाचा आकार इतर ठिकाणी असणाऱ्या शिवलिंगाच्या आकारापेक्षा लहान आहे. हे शिवलिंग थोडेसं त्रिकोणी आहे. शिवलिंग जागृत असल्याची मान्यता आहे. श्रावण महिन्यात सोमवारीच नव्हे तर दर दिवशी भाविक याठिकाणी दर्शनासाठी येतात, असं दादाराव चौधरी यांनी सांगितलं.

# टायर निखळत असलेली एसटी बस थांबवून १८ वर्षीय तरुणाने वाचवले ४५ जीव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

आष्टी मार्गावरील टाकरखेडा संभू परिसरात रविवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास मोठा अपघात टळला. एसटी बसचे ड्रायव्हर साइडचे मागील दोन्ही टायर निखळून जात होते. टाकरखेडा संभू येथील १८ वर्षीय प्रणव अजय काळे या तरुणाने ही बाब वेळीच लक्षात आणून दिल्यामुळे ४५ प्रवाशांवर ओढवणारी संकट टळले.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार टायरची कॉटर पिन निघाल्याने अचानक मागच्या बाजूचे टायर निखळून जात होते. ही बाब रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या प्रणवच्या लक्षात आली. त्यावेळी तो आपल्या शेताकडे जात होता.टायर निखळून जात असल्याचे पाहताच प्रणवने तातडीने चालकाला मोठ्याने आवाज दिला. आवाज न गेल्याने त्याने जवळच्या पाण्याच्या डबकीने गाडीच्या काचेला जोरात मारून बस थांबवली. त्यानंतर त्याने चालकाला टायर निखळून जात असल्याची माहिती दिली. प्रणवच्या या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला आणि ४५ प्रवाशांचे प्राण वाचले.

घटनेनंतर प्रवाशांनी प्रणवचे आभार मानले आणि कौतुक केले. काही महिला घाबरून पुढचा प्रवास थांबवून गावी परत गेल्या.

एसटीच्या देखभालीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याआधीही वलगाव, वायगाव, आष्टी मार्गांवर टायर निघण्याचे पाच ते सहा प्रकार घडले असल्याचे स्थानिकांनी सांगितले. त्यामुळे एसटी व्यवस्थापनाने या मुद्द्याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी पुढे आली आहे.

# 'समृद्धी'वर अपघातांची मालिका सुरुच

## वाशीम जिल्ह्यात दोन अपघातात तीन ठार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अकोला**

वाशीम जिह्यात दोन अपघातात तीन ठार झाल्याच्या घटना रविवारी घडल्या आहेत. भरधाव मोटारीने दोन दुचाकींना धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला. तर दुसऱ्या अपघातात समृद्धी महामार्गावर ट्रकने अज्ञात वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात ट्रक चालकाचा मृत्यू झाला. समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच आहे.

वाशीम जिल्ह्यातील कारंजा-दारव्हा मार्गावर भरधाव मालवाहू मोटारीने (क्र. एमएच २९ बी ७६८) दोन दुचाकींना जोरदार धडक दिल्याची घटना रविवारी घडली. या अपघातात सुभाष किसन चव्हाण (५५ वर्ष रा.शिक्षक कॉलनी, कारंजा) आणि नाना जयसिंगपूरे (५६ वर्ष, रा.खरडगाव ता. नेर, ह.मु. यशवंत कॉलनी, कारंजा यांचा मृत्यू झाला, तर जया नाना जयसिंगपूरे (वय ५०) आणि प्रभू माणिक राठोड (वय ४८ रा. कामठवाडा ता. कारंजा) हे गंभीर जखमी झाले आहेत. नाना जयसिंगपूरे हे पत्नी जया यांच्यासह तेरवीच्या कार्यक्रमासाठी नेर तालुक्यातील लोही येथे दुचाकीने (क्र. एमएच ३७ डी ६८१७) जात होते. सुभाष चव्हाण हे प्रभू राठोड यांच्यासह शेतीचे काम आटोपून दुचाकीने (क्र. एमएच ३७ एबी ५२१२) कारंजाकडे येत होते. यावेळी भरधाव मालवाहू मोटारीने दोन्ही दुचाकींना जबर धडक दिली.

अपघातग्रस्तांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून दोघांना मृत घोषित केले. गंभीर जखमी प्रभू राठोड यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलविण्यात आले, तर जया जयसिंगपुरे यांच्यावर स्थानिक खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघातानंतर मालवाहू मोटारीचा चालक वाहन घटनास्थळावर सोडून पसार झाला. या प्रकरणी कारंजा शहर पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून आरोपीचा शोध घेतला जात आहे. सुभाष चव्हाण हे मूळचे रामगाव रामेश्वर (ता. दारव्हा) येथील असून ते जिल्हा परिषद शाळेत शिक्षक होते. त्यांच्या पत्नी विजया चव्हाण ग्रामसेविका आहेत. नाना जयसिंगपूरे हे मुरंबी (ता. कारंजा) येथील पशुसंवर्धन विभागात कार्यरत होते. या दुर्दैवी घटनेमुळे दोन्ही कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# मंत्री नितेश राणेंची पुन्हा उद्धव ठाकरेंवर टीका

## हिंदुत्वाशी दगाबाजी केल्यानेच आमचे सरकार येऊ शकले नाही



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मोर्शी**

राज्यातील जनतेने २०१९ मध्ये भाजप-शिवसेना युतीला जनादेश दिला होता, पण त्यावेळी चपट्या पायाचे लोक राजकारणात असल्यामुळे त्यांनी हिंदुत्वाशी दगाबाजी केली. त्यामुळे आमचे सरकार येऊ शकले नाही, अशी टीका मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता आज येथे केली.

मोर्शी येथील शासकीय मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या समारंभाला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रताप अडसड, उमेश यावलकर, राजेश वानखडे, माजी खासदार रामदास तडस, नवनीत राणा आदी उपस्थित होते.

नितेश राणे म्हणाले, डॉ. अनिल बोंडे यांनी आपल्या भाषणामध्ये राहू-केतू यांच्यामुळे भाजपचे सरकार येऊ शकले नाही, असे सांगितले, पण मी सांगतो, २०१९ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदी विराजमान होणार होते, पण चपट्या पायाचे लोक राजकारणात असल्याने दगाबाजी झाली. आम्हाला जनादेश मिळाला होता, पण त्या लोकांनी हिंदुत्वाशी बेईमानी केली. मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे भूमिपूजन हे २०१९ मध्येच होणार होते, पण आता उशिरा का होईना भूमिपूजन होत आहे, ही आनंदाची बाब आहे. भाजपच्या सरकारच्या कारकीर्दीत ज्या प्रकल्पाचे भूमिपूजन होते आणि भाजप सरकारच्या काळातच त्या प्रकल्पाचे उद्घाटन होते. त्यामुळे आता दोन वर्षांतच या महाविद्यालयाचे उद्घाटन देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे, आताच त्यांची वेळ खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी घ्यावी, असे नितेश राणे म्हणाले.


# हुमणी अळीचा सोयाबीन पिकाला मोठा फटका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नांदगाव पेठ**

माहुली जहांगीर परिसरातील शेकडो एकरातील सोयाबीन पिकावर हुमणी अळीने अक्षरशः हल्ला चढवला असून पिकाचे जवळपास ७० टक्के नुकसान केले आहे.शेतकऱ्यांचे बहरलेले पीक हुमणी अळीने उध्वस्त केले असून यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. माहुली जहागीर येथील शेतकरी पंजाबराव यावले यांचे तीन एकरातील पीक उत्तम स्थितीत असताना अचानक वाढलेल्या हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे पाने, कोवळ्या शेंगा आणि रोपे जलद गतीने नष्ट होत आहेत.

# नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना आवडीचे शिक्षण घेता यावे - कुलगुरू

## विद्यापीठात 'होलिस्टिक ॲन्ड मल्टीडिसिप्लीनरी एज्युकेशन' विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

प्राचीन शिक्षण पध्दतीमध्ये व्यक्तिमत्व विकास, ज्ञानार्जन हा मुख्य उद्देश होता, मात्र कालानुरुप हा उद्देश मागे राहिला. आता नोकरी मिळविणे हाच शिक्षणाचा उद्देश झाला आहे. विद्यार्थ्यांचा हा बदलता कल पाहता, नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्याला पाहिजे ते व आवडीचे शिक्षण घेण्यास मदत करते आणि विद्यार्थी आपले ध्येय गाठू शकतात, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभाग व मालवीय मिशन टिचर ट्रेनिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत आयोजित 'होलिस्टिक ॲन्ड मल्टीडिसिप्लीनरी एज्युकेशन' विषयावर आणि 'ऑल राऊंड डेव्हलपमेंट थ्रू मल्टीडिसिप्लीनरी ॲप्रोच' या थीमवर साप्ताहीक राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी उद्घाटनीय व अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे, अधिसभा सदस्य डॉ. सुभाष गावंडे, जबलपूर येथील डॉ. विशाल बन्ने, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, शिक्षण घेत असतांना आयुष्याचं ध्येय विद्यार्थी ठरवित असतात. परंतु डॉक्टर, इंजिनियर, चार्टर्ड अकाऊंटंट एवढेच ध्येय निश्चित करुन चालणार नाही. ब्रिटीश काळात साक्षरतेचे प्रमाण अधिक होते. नंतरच्या काळात मात्र त्यात घट झाली. नवीन शैक्षणिक धोरण लागू झाल्यामुळे आता विद्यार्थ्यांना सर्वसमावेश आणि आवडेल तसे अभ्यासक्रम निवडता येतात. शिक्षणासोबतच तंत्रज्ञानाची जोड देवून विदेशात जसे शिक्षण घेतले जाते, त्याचप्रमाणे आपल्या देशातही तंत्रज्ञानाची जोड देवून शिक्षण घेता आले पाहिजे. त्याचबरोबर शिक्षकांनी अशा प्रकारच्या कार्यशाळांमध्ये मोठए प्रमाणात सहभाग घेऊन एक चांगला विद्यार्थी कसा घडेल, याकडे लक्ष दिले पाहिजे, असेही कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले.

व्य.प. सदस्य डॉ. मनिषा कोडापे यांनी सांगितले, नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा फार महत्वाची आहे. सर्वसमावेशक आणि सर्वांगीण विकास होणारे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळायला पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरणात समाविष्ट असलेल्या विविध महत्वाच्या पैलूंबाबत त्यांनी यावेळी माहिती दिली.अधिसभा सदस्य डॉ. सुभाष गावंडे म्हणाले, शारीरिक शिक्षणासोबतच इतरही विषय महत्वाचे असतात. खेळाडूंना घडवितांना ज्या ज्या विषयाचे ज्ञान आवश्यक असते, ते ज्ञान त्या खेळाडू विद्यार्थ्याला मिळाले पाहिजे व अशा प्रकारच्या कार्यशाळेच्या माध्यमातून खेळाडू विद्यार्थ्यांना निश्चितच त्या त्या प्रकारचे शिक्षण मिळेल, असे सांगून त्यांनी कार्यशाळेला शुभेच्छा दिल्या.

सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन व विद्यापीठ गीताने कार्यशाळेची सुरुवात झाली. प्रास्ताविकामधून शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी कार्यशाळा आयोजनामागील भूमिका सांगितली. सूत्रसंचालन विद्यार्थी आदेश रक्षे याने, तर आभार कु. सुरभि डोंगरे हिने मानले. उद्घाटन कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठए संख्येने उपस्थित होते.

# तिवसा वीज उपकेंद्रात बिघाड २० गावे मध्यरात्रीपर्यंत अंधारात

## नागरिकांनी व्यक्त केला रोष तिवसासह अमरावती महावितरणच्या पथकाचे स्तरावर प्रयत्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४तिवसा**

स्थानिक ३३ केव्ही उपकेंद्रात शुक्रवारी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास अचानक तांत्रिक बिघाड निर्माण झाला. त्यानंतर मध्यरात्री दोन वाजतापर्यंत वीजपुरवठा खंडित झाला असल्याने तालुक्यातील २० गावांतील ग्रामस्थांना मध्यरात्रीनंतरही अंधारात राहावे लागले. त्यामुळे ग्रामस्थांकडून मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त करण्यात आला. दरम्यान, महावितरणविभागाने युद्धस्तरावर दुरुस्तीचे काम हाती घेतल्यामुळे अखेर मध्यरात्रीनंतर गावात लखलखाट झाला.तिवसा येथील महावितरणच्या ३३ केव्ही उपकेंद्रामध्ये निर्माण झालेला बिघाड शोधण्यासह दुरुस्ती करण्यासाठी शनिवारी मध्यरात्रीनंतर २ वाजले होते. हा विघाड शोधण्यासाठी तिवसा येथे अमरावती येथील वीज वितरण कंपनीच्या पथकाला पाचारण करावे लागले. वीजपुरवठा पूर्ववत होईस्तोवर नागरिकांना विजेअभावी कमालीचा त्रास सहन करावा लागला. त्याचवेळी वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनाही आठ ते दहा तास सतत रात्रभर जागून काम करावे लागले. त्यानंतर नागरिकांना दिलासा मिळाला.

**'ही' २० गावे होती अंधारात**

उपकेंद्रात बिघाड निघाल्याने तिवसा, शेंदूरजना बाजार, डेहणी, सुरवाडी, आनंदवाडी, सातरगाव, करजगाव, वरुडा, दापोरी, जावरा, फत्तेपूर, नमस्करी, सार्सी, वणी, ममदापूर, सुल्तानपूर, काटपूर, इसापूर ही २० गावे पूर्णतः मध्यरात्री दोन वाजेपर्यंत अंधारात होती.

# बँकेकडून ग्राहकांची ४० लाखांनी फसवणूक

## सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल अचलपूर ठाण्याच्या हद्दीतील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अचलपूर**

ग्राहकांची तब्बल ४० लाख रुपयांनी फसवणूक करून बँक सुरू करणाऱ्यांनीच पळ काढला. ही धक्कादायक घटना शनिवार, २ ऑगस्ट रोजी अचलपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी क्रेडिट मॅनेजर रंजना वसंत बुरंगे (५१) रा. परतवाडा यांच्या तक्रारीवरून सात जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

युवराज भगवान गिहे रा. अमरावती,आकाश प्रमोद बोबडे रा. आसेगाव पूर्णा, निकिता युवराज गिहे रा. अमरावती, प्रीतम जनार्धन पडोळे रा. लाडकी, मोर्शी, दीपक बाबाराव इंगोले रा. जुनीवस्ती, बडनेरा, तानाजी शरद ठोमर रा. बिड व आकाश राऊत रा. दर्यापूर अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. युवराज गिहे व त्याच्या सहकाऱ्यांनी ही बैंक सुरू केली. त्यानंतर बँकेतील डेली डिपॉझिट, आरडी खाते, बचत खाते यासह गुंतवणुकीच्या इतरही स्कीम ग्राहकांना समजावून सांगण्यात आल्या. अधिक लाभाचे आमिष ग्राहकांना दाखविण्यात आले. त्यामुळे डेली डिपॉझिट १८८, खातेधारक १६, सेव्हिंग खाते ४९, आरडी खाते १६ अशा एकूण २६६ ग्राहकांनी या बँकेमध्ये वेगवेगळ्या गुंतवणुकीच्या प्लानमध्ये पैसे गुंतविले. दरम्यान, डेली डिपॉझिट २५ लाख ५ हजार, फिक्स डिपॉझिट ३४ हजार ७०० रुपये, आरडी १ लाख ३२ हजार ४१४, सेव्हिंग खात्यात २२ हजार ७५० रुपये असे एकूण २६६ खातेधारकांचे ४० लाख ९ हजार २४६ रुपये रोख रक्कम जमा झाल्यानंतर त्या सर्वांनी ग्राहकांचा परतावा न देताच पळ काढला. हा प्रकार समोर आल्यावर क्रेडिट मॅनेजर रंजना बुरंगे यांनी अचलपूर ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# शेतीचा दर्जा दिल्याने मत्स्यव्यवसाय प्राधान्याचे क्षेत्र : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मोर्शी येथील मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे भूमिपूजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

मत्स्य व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य शासन विविध प्रयत्न करीत आहेत. यातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे शासनाने मत्स्य व्यवसायाला शेतीचा दर्जा दिला आहे. हा दर्जा बहाल केल्यामुळे मत्स्य शेती करणाऱ्यांना कर्ज, किसान क्रेडिट आणि अनुषंगिक बाबी प्राधान्याने मिळण्यास मदत झाली आहे. यामुळे मत्स्य व्यवसाय आज प्राधान्याचे क्षेत्र झाले आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.मोर्शी येथे आज महाराष्ट्रातील चौथे आणि पश्चिम विदर्भातील पहिल्या मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे भूमिपूजन पार पडले. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मत्स्यव्यवसाय तथा बंदरे मंत्री नितेश राणे, खासदार अनिल बोंडे, आमदार प्रताप अडसड, केवलराम काळे, उमेश यावलकर, राजेश वानखेडे, प्रवीण तायडे, चैनसुख संचेती, रामदास तडस, नवनीत राणा, पशुसंवर्धन दुग्ध व मत्स्यव्यवसाय विकास विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., महाराष्ट्र पशु मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, कार्यकारणी सदस्य अनुराधा चव्हाण आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यात मत्स्य व्यवसायाला चालना मिळावी यासाठी विविध निर्णय घेण्यात आले आहेत. समुद्रातील मासेमारी व्यवसायावर लक्ष केंद्रित असले तरी आज ४० टक्के मत्स्य व्यवसाय गोड्या पाण्यावरील व्यवसायामधून होतो. यात वाढ करण्यासाठी या क्षेत्राला सर्वतोपरी मदत केली जाईल. शासनाच्या मदतीने शेतकऱ्यांनी शेततळ्यांमध्ये शेतीच्या सिंचनासह मत्स्य व्यवसाय सुरू केल्याने त्यांना अडचणीच्या काळात मदत झाली आहे. तसेच रोजगाराची संधीही निर्माण झाली आहेत. शेतकऱ्याचे जीवनमान उंचावे यासाठी आपदग्रस्त परिस्थितीमध्ये मदत करण्याचे धोरण ठरवले आहे. शेतीसाठी प्रामुख्याने सिंचन व्यवस्था उभारण्यासाठी प्रकल्प मार्गी लावण्यात येत आहे. विदर्भाची भाग्यरेखा ठरणाऱ्या वैनगंगा – नळगंगा या साडेपाचशे किलोमीटरच्या योजनेमुळे गोसेखुर्दचे पाणी बुलढाणापर्यंत जाणार आहे. यात ३१ धरणे भरणार असून एक लाख कोटी रुपयांचा खर्च या प्रकल्पावर करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना मदतीसोबतच शेतीमध्ये गुंतवणूक करणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक वर्षात पाच हजार कोटी याप्रमाणे पाच वर्षात २५ हजार कोटीची गुंतवणूक केली जाईल. शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी महत्त्वाची असली तरी अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशीनुसार उपाययोजना करण्यात येणार आहे. त्यासोबतच शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या सर्व सुविधा नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेतून देण्यात येणार आहे. शासनाच्या या विविध प्रयत्नांनी शेतीमध्ये परिवर्तन व्हावे, यासाठी प्रयत्न करण्यात येतील.शेतकऱ्यांना दिवसा बारा तास वीज उपलब्ध व्हावी, यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा प्रायोगिक प्रकल्प मोर्शीमध्येच राबविण्यात आला आहे. शासनाने केलेल्या आश्वासनानुसार पुढील पाच वर्षे शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे. वीज क्षेत्रात करण्यात आलेल्या सुधारणांमुळे पहिल्यांदाच विजेचे दर कमी झाले आहे. येत्या पाच वर्षात १०० युनिटपर्यंत विजेचा वापर करणाऱ्यांचे वीज देयक आजच्या पेक्षा २६ टक्क्याने कमी होणार आहे. प्रत्येकाला स्वतःचे घर मिळावे, यासाठी केंद्र शासनाच्या मदतीने ३० लाख घरे मंजूर झाली आहे. येत्या काळात सर्वेक्षणातून सुटलेल्या नागरिकांनाही त्यांना स्वतःचे हक्काचे घर मिळवून देऊन बेघर मुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्यात येणार आहे. त्यासोबतच ५० हजार रुपयांची मदत करून पाच लाख घरांवर सोलर यंत्रणा बसविण्यात येणार आहे. यातून गरजू नागरिकांची वीज बिलातून मुक्तता होणार आहे. तसेच अतिरिक्त वीज निर्माण झाल्यास शासन ती खरेदी करणार आहे. शेतकऱ्यांना सर्व बाजूंनी मदत करून त्यांचे जीवन सुकर करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी मत्स्य विज्ञान महाविद्यालय मोर्शी येथे होणे हा अभिमानाचा क्षण आहे. मुख्यमंत्र्यांनी विकसित महाराष्ट्राचे धोरण ठरविले असून या दिव्यांग, शेतकरी, शेतमजूर अशा सर्वच घटकांना न्याय देण्याचे धोरण आखले आहे. दिव्यांगांना अडीच हजार रुपये महिना मदत देण्यात येत आहे, तर कर्जमुक्तीची गरज असलेल्यांना मदत करण्यासाठी समिती स्थापन करून विविध निर्णय घेण्यात येणार आहे. प्रत्येक शेतीमध्ये जाण्यासाठी पानंद रस्ता तयार करण्यात येऊन शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल बाजारपेठेत पोहोचावा, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच येत्या काळात चिखलदरा परिसराला पर्यटनाचा केंद्रबिंदू ठरवून विकास करण्यात येणार आहे. त्यासोबतच मोर्शी परिसरातील संत्र्यावरील प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यात येणार आहे.मंत्री श्री. राणे म्हणाले, मत्स्य विज्ञान महाविद्यालयाची इमारत येत्या दोन वर्षात पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. या महाविद्यालयामुळे मच्छीमारांना चांगले दिवस येऊन आर्थिक सक्षम होण्याबरोबर समृद्धी येईल. मत्स्यला कृषीचा दर्जा दिल्याने अनेक सवलतींचा लाभ होणार आहे. येत्या काळात गोड्या पाण्यातील मच्छीमारांनाही महत्त्व दिले जाणार आहे. यासोबतच मत्स्य व्यवसायात क्रांतिकारी बदल घडवून येण्यासाठी मार्वल कंपनीसोबत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी करार करण्यात आला आहे. यामुळे मच्छीमारांच्या जीवनात बदल घडून येतील. मोर्शी येथील महाविद्यालयात चांगल्या शिक्षणासोबत उत्कृष्ट दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कायम प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.खासदार अनिल बोंडे यांनी प्रास्ताविकातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर महाविद्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन करून कोनशिलेचे अनावरण केले. यावेळी भोई समाजातर्फे मुख्यमंत्र्यांचा पुष्पहाराने सत्कार करण्यात आला. तसेच जिल्ह्यातील पाच रस्ते विकास कामांचे लोकार्पण करण्यात आले. क्षिप्रा मानकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलगुरु डॉ. पाटील यांनी आभार मानले.

# चंद्रशेखर बावनकुळे यांची बच्चू कडूंवर अप्रत्यक्ष टीका

## नौटंकी करून काही मिळणार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मोर्शी**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोर्शी येथील एका कार्यक्रमात विना नावाचा उल्लेख करत अपक्ष आमदार बच्चू कडूंवर अप्रत्यक्ष टीका केली. काही लोक नौटंकी करतात, आंदोलनं करतात, फ्रॉमहाऊस बांधतात, मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतात आणि मग कर्जमाफीसाठी समितीची मागणी करतात, असे वक्तव्य करत त्यांनी बच्चू कडूंवर निशाणा साधला.

बावनकुळे म्हणाले, अमरावतीत अनेकांनी आंदोलनं केली, नौटंकी केली. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणत्याही गदारोळाशिवाय दिव्यांगांसाठीचा भत्ता १५०० रुपयांवरून थेट २५०० रुपये केला. यामधून त्यांनी सरकारच्या कार्यक्षमतेवर भर देत, विरोधकांच्या आंदोलनात्मक शैलीवर टीका केली.

ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांसाठी केंद्र व राज्य सरकार गंभीर आहे. पण काही लोक शेतात फ्रॉमहाऊस



बांधतात, नंतर कर्जमाफी मागतात. त्यामुळे अशांसाठी समिती तयार करण्यात आली आहे. हे बोलताना त्यांनी कोणाचेही नाव घेतले नसले, तरी बच्चू कडू यांना उद्देशूनच ही टीका असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.बावनकुळे यांच्या या वक्तव्यामुळे मोर्शीतील राजकीय वातावरण तापले असून, यावर बच्चू कडू काय प्रत्युत्तर देतात, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

# बावनकुळे यांच्या टीकेला प्रहारचा मिर्ची आंदोलनाने जोरदार प्रत्युत्तर

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संतप्त कार्यकर्त्यांकडून घोषणाबाजी, गौरी पेटवून निषेध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल अमरावतीत एका कार्यक्रमात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर नौटंकी असा उल्लेख करत अप्रत्यक्षपणे प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्यावर टीका केली होती. या वक्तव्याचा तीव्र निषेध करत आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या




कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोख्या पद्धतीने आंदोलन केलं.या आंदोलनात कार्यकर्त्यांनी बावनकुळे यांच्या पोस्टरला मिरचीची धुनी दिली, शेणाच्या गौरीची प्रतिकात्मक होळी करून त्यावर मिरच्या फेकल्या. बावनकुळे माफी मागा, शेतकरी विरोधी सरकार हाय हाय, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनकर्त्यांनी सरकारच्या बेजबाबदार धोरणांवरही सडकून टीका केली.प्रहारच्या नेत्यांनी स्पष्ट केलं की, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणं ही नौटंकी नसून, शेतकऱ्यांना फसवणं आणि त्यांच्या वेदनांची खिल्ली उडवणं हीच खरी नौटंकी आहे. बावनकुळे यांनी तात्काळ माफी मागावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

# महिला पोलीस आशा धुळे (तायडे) यांच्या हत्येसाठी पतीकडून पाच लाखांची सुपारी;दोन सुपारी किलर अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

शहरातील महिला पोलीस अंबलदार आशा धुळे (तायडे) यांची हत्या प्रकरण उकलताना धक्कादायक माहिती समोर आली आहे. या हत्येसाठी पती राहुल तायडे यानेच पाच लाखांची सुपारी दिली होती. पोलिसांनी दोन सुपारी किलर – श्रेयस महल्ले व ओम



शिकार यांना अटक केली असून त्यांना २५ हजारांची ॲडव्हान्स रक्कम देण्यात आली होती. राज्य राखीव पोलीस दलात कार्यरत असलेल्या आरोपी पतीने एक महिन्यांपूर्वीच पत्नीच्या हत्येचा कट रचला होता. त्याने दोन मित्रांच्या मदतीने तिचा गळा दाबून खून केला. तपासादरम्यान दोघेजण तोंडाला कापड बांधून घटनास्थळी जात असल्याचे सीसीटीव्हीत आढळले. फ्रेजरपुरा पोलिसांनी आतापर्यंत तिघांना अटक केली आहे. राहुल तायडे याचे एका महिलेशी प्रेमसंबंध होते. त्यामुळे पती–पत्नीमध्ये सतत वाद होत होते. यापूर्वी आशा तायडे यांनी पतीविरोधात पोलिसात तक्रारही दिली होती. गुन्ह्याचा आढावा घेत असताना आरोपीने पूर्वी चोरीचा बनावही केला होता, असे तपासात निष्पन्न झाले आहे.

# अग्निपथावर यशस्वी पाऊल – विष्णोरा येथील प्रज्वल ठाकरे याचे जंगी स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४विष्णोरा**

देशसेवेच्या स्वप्नांनी प्रेरित होऊन, खडतर प्रशिक्षणाची वाट पार करत अग्नीवीर बनलेला प्रज्वल ठाकरे याचे आज गावात जंगी स्वागत करण्यात आले. वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी बी.कॉम. शिक्षण पूर्ण करून भारतीय लष्करात अग्नीवीर म्हणून भरती झालेल्या प्रज्वलच्या आगमनाने गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.



प्रज्वल हा विष्णोरा येथील शेतकरी बाळासाहेब शामराव ठाकरे यांचा मोठा मुलगा. कुटुंबात आई–वडील, दोन भाऊ व एक बहीण असा गरिबीतही आनंदाने जगणारा कुटुंबीयांनी अनेक स्वप्न उराशी बाळगून प्रज्वलला शिकवले. आई–वडिलांची मेहनत व त्यांचा त्याग वाया जाऊ नये यासाठी प्रज्वलने स्वतःवर कठोर मेहनत घेतली. अभ्यासू वृत्ती आणि देशसेवेची तळमळ यामुळे तो अग्निपथ योजनेअंतर्गत भारतीय लष्करात दाखल झाला.त्याने सुरुवातीचे सहा महिने बेंगळुरू येथे तर नंतर तीन महिने जम्मू–काश्मीरमध्ये पॅरा कमांडोचे विशेष प्रशिक्षण पूर्ण केले. सध्या त्याची नियुक्ती उत्तर प्रदेशातील अयोध्या येथे झाली आहे. गावात प्रथमच परतल्यानंतर प्रज्वलचा ज्या उत्साहात स्वागत करण्यात आला, त्याने संपूर्ण गावाचे लक्ष वेधून घेतले. गावातील युवकांनी डीजेच्या गजरात त्याची मिरवणूक काढली. घरच्या अंगणात स्वागतासाठी रांगोळ्या, तोरण, आणि फटाक्यांची आतषबाजी झळकली.

या वेळी बोलताना प्रज्वल म्हणाला, माझं स्वप्न लहानपणापासूनच भारतीय सेनेत जाण्याचं होतं. मी खूप मेहनत घेतली. आईवडिलांचा त्याग व माझी चिकाटी यांच्या जोरावर आज मी इथवर पोहोचलो. देशसेवेची संधी मिळणं हे माझं भाग्य आहे.

प्रज्वलच्या या यशामुळे संपूर्ण गावाचा अभिमान उंचावला आहे. शाळा, महाविद्यालयात त्याचे नाव आदराने घेतले जात आहे. गावातील शिक्षक, तरुण मित्रमंडळी, आणि शेतकरी बांधवांनी प्रज्वलच्या या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आज विष्णोराचे नाव भारतीय सेनेच्या शौर्यगाथेत कोरले गेले असून, प्रज्वलच्या कार्यामुळे अनेक तरुणांना नवसंजीवनी मिळाली आहे.

# हॉकर्स झोनच्या मागणीसाठी शेकडोंची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

## मनपा प्रशासनाविरोधात प्लास्टिक बंदुका घेऊन घोषणाबाजी; तातडीने मागण्या मान्य करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

युवा स्वाभिमान पार्टीच्या अंतर्गत कार्यरत हॉकर्स संघटनेच्या वतीने आज अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. इर्विन चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या मोर्चाला सुरुवात झाली.

शहरातील शेकडो हॉकर्स या मोर्चात सहभागी झाले होते. हातात प्लास्टिकच्या बंदुका घेऊन त्यांनी मनपा प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी केली. अतिक्रमण निर्मूलन थांबवा, हॉकर्स झोन द्या, अशा घोषणा देत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकला.हॉकर्स संघटनेने स्पष्टपणे सांगितले की, महानगरपालिकेकडून वारंवार केली जाणारी अतिक्रमण हटाव कारवाई अन्यायकारक असून शहरात अधिकृत हॉकर्स झोन उपलब्ध करून दिले गेले पाहिजे. प्रशासनाने तातडीने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संघटनेकडून देण्यात आला.



आता हिंदु धर्मातील सर्व सनाचे दिवस असून यामध्ये गणेशोत्सव, नवरात्र व दिवाळी असल्याने या कार्यवाहीमुळे सर्व हॉकर्स धारक हे आपला व्यवसाय करु शकत नसल्यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ येत आहे. आपणांस विनंती आहे की, ज्या प्रकारे नक्षलवाद्याना आत्मसर्पण केल्यास त्यांचा मुलांना शासन नोकरी देते त्याच प्रमाणे हॉकर्स व्यावसायीकांनी हॉकर्स व्यवसाय बंद केल्यास त्यांचा मुलांना नोकरी शासनाने देण्याचा निर्णय घ्यावा. आमच्या हॉकर्स व्यावसायीकांना सुध्दा हातामध्ये बंदुक घेवुन नक्षलवाधी तयार करण्याचा प्रयत्न शासनाने करु नये.असेही निवेदनात स्पस्ट केले आहे.

सदर कार्यवाही थांबविण्याकरीता मनपा प्रशासनाला निर्देश दयावेत व सर्व हॉकर्स व्यावसायिकांना न्याय मिळवुन दयावा अशी मागणी स्वाभिमानी हॉकर्स युनियन च्या वतीने करण्यात आली आहे.यावेळी जिल्हा अध्यक्ष गणेश मरोडकर,दिगंबर कोरडे,वंदना शिरभाते, संदीप भुयार सह शेकडो पथविक्रेते या मोर्चात सहभागी झाले होते.

# वीजग्राहकांना तत्पर सेवा देत महावितरणचा, स्वतःचा नावलौकिक वाढेल अशी कामगिरी करा

## संचालक श्री. राजेंद्र पवार यांचे अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील वीज ग्राहकांना अत्यंत तत्परतेने व जबाबदारीने सेवा देत स्वतःचा व पर्यायाने महावितरणचा नावलौकिक वाढेल अशी कामगिरी करा. ग्राहक संवाद साधत 'एक गाव एक दिवस' मोहीम राबवत दर्जेदार वीजपुरवठ्याच्या देखभालीचे कामे, नवीन वीजजोडणी व वीजबिलांच्या वसूलीचे कामे प्रभावीपणे करा असे निर्देश महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी दिले.येथील विद्युत भवनामध्ये अमरावती जिल्ह्यातील सर्व विभागांच्या कामकाजाचा व विविध कामांचा शनिवारी आढावा घेताना ते बोलत होते. मुख्य अभियंता श्री. अशोक साळुंके, अधीक्षक अभियंता श्री. दिपक देवहाते व श्रीमती दिपाली माडेलवार, परिमंडल कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख,सर्व विभागीय कार्यकारी अभियंते आणि उपविभागीय अभियंते उपस्थित होते.